


# श्री साईलीला

मे

किं. ५० पैसे

१९६५

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जिलेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

रोग काय किंवा आरोग्य काय त्यांचा उद्‌भव उगाच होत नाहीं. तो पूर्वार्जित पाप-पुण्याचा ठेवा असतो. तो वाटा मिळाला असतां त्याला झिडकारतां येत नाहीं. त्याग करून तो तुम्हांला सोडून जात नाहीं, तो तुम्हीं भोगलाच पाहिजे. त्याला कोणताहि उपाय नाहीं. हें भोगणें जन्मजन्मांतरी चालूंच असतें. एक उपाय आहे. तुमच्या थोर भाग्यानें जर कां तुम्हाला संतदर्शन घडलें व त्यांचा कृपाप्रसाद तुमच्या वाट्यास आला तर मात्र तुमच्यांत क्रांति घडून येईल. तुमच्या दुःखभोगाला त्यांच्या कृपेनें ओहोटी लागेल.

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ]  मे १९६५  [ अंक २ रा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०,

बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

आम्हीं आमच्या वागण्यावर त्याचप्रमाणें विशेषतः वाणीवर ताबा ठेवायला शिकलें पाहिजे. जें बोलायचें तें हितकर व मधुर कोणाला टोचून किंवा जखमी करणारें वचन आमच्या मुखांतून सहसा कधींही बाहेर पडणार नाहीं याबद्दल आम्हीं जास्तींत जास्त दक्षता बाळगिली पाहिजे. एकदां मुखावाटे शब्द बाहेर पडला म्हणजे तो मागे घेतां येत नाहीं.त्याचे बरेवाईट परिणाम दुसऱ्यांस भोगावे लागतात याची सतत जाणीव ठेवून जें हितकर पथ्यकर तेंच बोलावयाचें, नाहींतर मुग्ध रहावयाचें, असा आपण नियम केला पाहिजे. व तो आचरणांत आणण्यासाठी अहर्निश झटलें पाहिजे. जें प्रियकर व सत्य असेल तेंच बोलायचें असा आमच्या शास्त्रकारांनीं नियम घालून दिला आहे.

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् मा ब्रूयात् सत्यमप्रियम् । प्रियं च नानृतं ब्रूयात् एष धर्मः सनातनः ॥

सत्य बोला परंतु अप्रिय सत्य बोलू नका. प्रिय बोला; परंतु खोटें बोलूं नका. हा आपला सनातन धर्म आहे. तेव्हां महत्त्वाची गोष्ट हीच आहे कीं आम्ही प्रत्येक शब्द तोलून मापून विचारपूर्वक उच्चारला पाहिजे. या गोष्टीचें आचरण केल्यानें दुसऱ्यांस सुख व शांति मिळते, एवढेंच नव्हे त्या गोष्टींचा लाभ आपणासही जरूर मिळत असतो.

हेंच पहा ना रोजच्या रोज आम्हीं आमच्या वाणीचा किती दुरुपयोग करीत असतों. रोज आमच्या मुखांतून दुसऱ्यांचीं मनें दुखविणारे किती कठोर निर्दय शब्द बाहेर पडत असतात बरें ? आपण कधीं त्याचा विचार केला आहे का ? देवानें वाणी दिली आहे तिचा दुरुपयोग वाटेल तसा करावयाचा ? त्यापेक्षां कमी बोललें किंवा न बोललें तर काय बिघडेल ? परंतु नाहीं ! आमची जीभ बोलायला सतत वळवळत असते.

वाणीवर ताबा ठेवायला व कमीत कमी बोलायला आम्ही शिकलें पाहिजे. आधुनिक काळांतील श्रेष्ठ पुरुष महात्मा गांधीजी कसे वागत, कसे बोलत याकडे कधी लक्ष पुरविलें आहे का ! जरुरी पुरतेंच व कमीत कमी बोलायचें; शक्य तोंवर मौन पाळायचें असे त्यांनीं स्वतःवर निर्बंध लादून घेतले होते. त्यामुळें त्यांच्या वाणीला शब्दा शब्दाला तेज व महत्त्व प्राप्त झालें. त्यांचा प्रत्येक शब्द झेलावा असें प्रत्ये-

खास वाटावे, ही किमया त्यानीं सत्य बोलण्याचा व जरुरी पुरतेंच बोलण्याचा मार्ग स्वीकारल्यामुळें प्राप्त करून घेतली होती.

कधीं कधीं आपण सहज हास्य विनोदांत गुंग असतों व आपल्या मुखांतून सहजगत्या वर्मी लागणारे शब्द बाहेर पडून जातात व त्याचे दुष्परिणाम कधींना कधीं आपणास भोगावे लागतात. खून, मारामाऱ्या, रक्तपातापर्यंत त्यांची मजल जाते !

याचा आरंभ आपण आपल्या घरापासून केला पाहिजे.लहानपणापासून आपल्या मुलांबाळांना खरें व गोड बोलण्याची तसेंच वायफळ न बोलण्याची सवय लावली,परंतु तसेंच आचरण आम्ही वडील मंडळींनीं डोळ्यांत तेल घालून केलें पाहिजे.मुलें वडील मंडळींचा कित्ता गिरवितात. तेव्हां आम्हीं त्यांच्यापुढें खरें बोलण्याचा मधूर बोलण्याचा दुरुत्तर न करण्याचा व कमीत कमी बोलण्याचा कित्ता ठेविला पाहिजे.

मधूर भाषण करणारा, गोड गाणारा माणूस सर्वांना आवडतो. कारण त्यांत लालित्य व माधुरी असते. मध सर्वांना चाखावासा वाटतों, कारण तो मधूर गोड असतो तशी आपली वाणी गोड, रसाळ व सुरेल असावी.

गोड गाण्याची आपण प्रशंसा करतों; तसेंच आहे सत्य व गोड बोलण्याचें. एखाद्याचा शब्दानें पाडाव करण्याची ईषा बाळगणें अत्यंत आसुरी आहे. तो मार्ग आपला नव्हे. यासाठीं जीभ ताब्यांत ठेवायला शिकणें, बोलण्यावर संयम ठेवणें व जरूर तेव्हां आणि एखाद्याच्या कल्याणाचें असेल तेव्हांच बोलायचें, हा नियम आम्ही स्वतःसाठीं घालून घेतला पाहिजे. हें एक प्रकारचें तपाचरण आहे म्हणा ना. परंतु तें आपल्या जीवनाला शोभा आणणारें व जीवन सुवर्ण मोलाचें करणारें असल्यामुळें तें वाङ्मय तप आपण अत्यंत कसोशीनें व इमानें इतबारें आचरणांत आणण्यासाठीं सदासर्वकाळ झटलें पाहिजे. त्यांत जीवनसाफल्य आहे.

—संपादक



# एवढें हातून घडेल कां ?

देव दयाळू आहे. त्या बाबतींत त्याची तुलना दुसऱ्या कोणाशीं करतां येणार नाहीं. तो प्रत्येकावर आपल्या कृपेची पाखर सदा सर्वकाळ पसरीत असतो. माझ्या वाट्यास त्याच्या कृपेनें जें कांहीं येतें—मग तें सुख असो वा दुःख असो. तो जें कांहीं देतो तें माझ्या कल्याणासाठींच असतें. दुःख वाट्यास आलें म्हणून काय झालें, तो मीं त्याचा आशिर्वाद मानावा. सोनें विस्तवांत तापवल्यानें तें शुद्ध बनतें नाहीं कां ? त्याचप्रमाणें भगवंताला मी शुद्ध व निर्मळ व्हावेसे वाटतें. त्यासाठीं तो मला दुःखाच्या आगींत भाजून काढीत नसेल कशावरून ? तेव्हां माझ्या वाट्यास दुःख आलें तरी तें माझ्या कल्याणासाठींच असतें असें मी समजून कां चालू नये ! मला त्याच्या पायाशीं जायचें आहे ना ? मग शुद्ध होऊन नको का जायला ! देव माझा सखा, माझा कल्याणकर्ता आहे. त्याला माझी चिंता आहे. माझ्याकडे त्याचें लक्ष आहे. त्याच्याशिवाय माझें म्हणायला दुसरें कोणी नाहीं. तो मला कधींहि अंतर देणार नाहीं अशा श्रद्धेनें मी जगांत वावरावें.

त्याची आठवण मला सतत होत रहावी, त्यासाठीं ' हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ! हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे !! या मंत्राचा जप नेहमी करावा. त्यामुळें मनांत पापी विचारांचा प्रवेश होणार नाहीं.

कोणतीहि परिस्थिति वाट्यास येवो. गडबडून जातां कामा नये अथवा निराशही होतां कामा नये. उदासीनतेचा आपण सर्वस्वी त्याग केला पाहिजे. तो कृपावंत आहे. त्याची कृपा माझ्यावर आहे. तो मला कधींही अंतर देणार नाहीं. ही आपली बळकट श्रद्धा असली पाहिजे. भाव धरारे आपुलासा देव करा रे. ''

' अहंकार ' त्याचा सर्वस्वी त्याग करून सर्वांशीं आत्यंतिक नम्रतेनें वागण्याचें धोरण स्वीकारलें पाहिजे. सहनशीलता हा एक बहुमोल गुण आहे. त्याची आपण सदैव कांस धरली पाहिजे.

या संसारातील आपले संबंध आपली नातीगोती ती काय कामाची ! त्यांना आपण वाजवीपेक्षां फाजील महत्व केव्हांही देतां कामा नये. त्यांच्या जाळ्यांत अडकून जातां कामा नये. जेवढ्यास तेवढें. तें चिकटणें नको. अंती तें त्रासदायक होतें ! कोणावर राग रोष नको. मायाममता. नको; आणि

# शान्ताकारम् भुजगशयनम्

लेखक : आप्पाराव

भगवंताची प्रार्थना करतांना आपण 'शान्ताकारं भुजगशयनं—' हा श्लोक म्हणत असतों. पांच फडाच्या सर्पाचें आसन बनवून त्यावर भगवान आरामांत पहुडले आहेत अशी प्रतिमाही पहातों. परंतु विषारी सर्पासनावर भगवान निर्धास्तपणें व शांतपणें पहुडले आहेत हें कशाचें प्रतिक आहे? त्यावरून आपण कोणता बोध घ्यावयाचा? कोणता धडा शिकावयाचा?

तें आपल्या जीवनांतील एक महत्त्वाचें गुह्य प्रगट करणारें प्रतीक आहे. भगवंताला त्यावरून कोणती गोष्ट सूचित करायची आहे?

आपलें जीवन हें कंटकमय आहे. हें संसार जीवन सरळ, सुखमय व साधेसुधें नाहीं. तें नाना प्रकारच्या संकटांनीं बंधनांनीं चिंता–काळज्या व दुःखें यानीं व्यापलेलें आहे. या संसारी जीवनांत नाना प्रकारचे कष्ट व दुःखें निमूटपणें व शांतपणें सोसायची असतात. विषारी नागासारखीं माणसें तुमच्या वाईटासाठीं टपून बसलेलीं आहेत. त्या सर्वांवर तुम्हीं विजय मिळवायचा आहे. एका संकटांतून मुक्त व्हावे तों दुसरें संकट दत्त म्हणून उभें. यांतून एकदांचा पार पडलों म्हणजे मी एकदांचा दुःखमुक्त होईन अशी आपण आशा करावी तो तिसरेंच एखादें अकल्पित संकट दाराशीं खडें असतें. त्याचें स्वागत करणें प्राप्त असतें! अशावेळीं कोण कातावून जाणार नाहीं?

---

कोणाच्या'ही मोहांत अडकणें नको! तें काय कामाचें? दुःखास कारण!

कधीं कधीं ध्यानाकडे, जपाकडे लक्ष लागेनासें होतें. मग काय करायचें! उत्तमोत्तम ग्रंथ हातीं घेऊन त्यांचें वाचन करण्यांत वेळ घालवायचा. वाचनं तोही एक प्रकारचा जप आहे. कामें थोडीं का आहेत! प्रत्येक काम म्हणजे त्याची सेवा, त्याचें पुजन या भावनेनें प्रत्येक लहानथोर कामाकडे पहायचे व तें लक्षपूर्वक आणि उत्तम प्रकारें पार पाडण्यासाठीं झटायचें.

एवढें हातून घडेल का!

---

### हा जन्म झगडण्यासाठीं

परंतु नाहीं; आपण कातावून किंवा घाबरून नाहीं जायचें ! संकटे, अडचणी व काळजीचे प्रसंग येतील तसेच ते निघूनही जातील. हें रहाटगाडगें सदासर्वकाळ चालू रहावयाचें. जो खरा कर्मयोगी असतो तो या साऱ्या गोष्टींकडे त्रयस्थाच्या भूमिकेवरून पहात असतो. एकेक संकट येईल तसतसें धैर्यानें व निर्धारपूर्वक त्याला तोंड द्यावयाचें. परिस्थितीशीं झगडण्यासाठीं तर आपला जन्म आहे. या युद्धांतून पळ नाहीं काढायचा. तो आपला धर्म नव्हे. जो निर्धारपूर्वक झगडतो तो यश मिळविल्याशिवाय रहात नाहीं. दुःखी किंवा निराश कोणत्याही परिस्थितींत व्हावयाचें नाहीं. तो आपल्या पुरुषार्थाचा अपमान आहे. ती नामुष्की आहे. ती आपण पदरांत बांधून घेतली तर मग आपलें पुरुषत्व तें काय राहिलें ?

### संकटाशिवाय माणूस नाहीं

कोणतीही परिस्थिति वाट्यास येवो, सदा प्रसन्न व आनंदी रहाणें हाच आपला धर्म व हेंच आपलें परम कर्तव्य आहे. 'शांताकारं भुजगशयनं' कशासाठीं ? ही बहुमोलाची शिकवण तुम्हां आम्हांला देण्यासाठीं !

असा या जगांत कोण जन्माला आला आहे कीं, ज्याच्या वाट्यास दुःखाचा लवलेश बिलकूल येत नाहीं. सदासर्वकाळ सुख, आनंद आणि समाधान. दुःखाचें नांव नाहीं. सदासर्वकाळ प्रकाश, काळोख बिलकूल नाहीं. अडचण नाहीं. परंतु निःष्कंटक मार्ग. कोणत्याही मार्गानें केव्हांही जा !

या जगांत ज्याच्या वांट्यास अडीअडचणी, दुःखताप, संकटें कधीही आलीं नाहींत असा कोणी सापडू शकेल का ?

कितीही अडचणी,अडथळे येवोत त्यांना न डगमगतां त्यांना धैर्यानें सामना देण्यास सज्ज व्हा. कशाच्या बळावर ? भगवंत माझा सदैव पाठीराखा आहे.तो मला अंतर देणार नाहीं. तोच संकटें आणणारा आणि तोच त्यांतून पार पाडणारा—ही श्रद्धा आपल्या अंतःकरणांत कायमचें घर करून राहूं द्या. तिच्या बळावर तुम्हीं सर्व संकटांवर विजय मिळवूं शकाल. डरो मत !

### आत्महत्येची तयारी

या जगांत आपल्या सभोंवार हरघडी आपण किती तरी माणसें अशी पाहातों कीं, जी लहानसहान अडचण किंवा संकट आलें म्हणजे तात्काळ गर्भगळीत होतात. हातपाय गाळतात. त्यांची कंबर खचून जाते व घाबरून कित्येक जण आत्महत्या करण्यासही प्रवृत्त होतात !

किती नामुष्कीची गोष्ट आहे ही ! आपला जन्म कशासाठीं ? आत्मघात करण्या-

साठीं ? नाहीं ! नाहीं !! पुरुषार्थ गाजविणें, आलेल्या संकटावर मात करणें व न डगमगता त्यांच्यावर विजय मिळविणें यासाठीं. माणसाला भय, निराशा यांचा स्पर्श कोणत्याही परिस्थितींत होतां कामा नये.

## भय कशासाठीं व कोणाचें ?

आपण धर्मानें वागायचें, पुण्याचरण करायचें, कोणाचेंही अहित करायचें नाहीं व चिंतायचेंही नाहीं. आपलें जें प्राप्त कर्म असेल तें देवाला स्मरून इमानें इतबारें पार पाडण्यासाठीं झटावयाचें. अशा रीतीनें वागणाऱ्यानें भय कोणाचें बाळगायचें ? निराश कां व्हायचें ?

ईश्वरानें आपणास मानव जन्म दिला आहे तो कशासाठीं ? दानव बनण्यासाठीं का ? हा जन्म पुरुषार्थासाठीं व देवत्त्व मिळविण्यासाठीं आहे. याच जन्मांत आपणांस देवत्त्व प्राप्त करून घ्यायचें आहे. आपण भागूबाई न होतां वीर पुरुषाप्रमाणें वागायचें आहे. साऱ्या दुष्ट प्रवृत्ति दूर झुगारून द्यावयाच्या आहेत. त्यांच्या वाऱ्यालाही उभे राहावयाचें नाहीं. आपला मार्ग पुरुषार्थाचा आहे. तो गाजवूनच सुटका. म्हणून 'उत्तिष्ठत परंतप.'

## संकटें हीं यायचींच

संकटें येत नाहींत कोणावर ? म्हणून त्यांच्यापुढें नामुष्कीनें आपण मान का वाकवायची ? त्यांना आपण आव्हानपूर्वक सांगितलें पाहिजे कीं, बाबांनो ! या ! तुमच्याशीं सामना द्यायला मी सज्ज होऊन राहिलों आहे. तुम्हीं मला घाबरून नामोहरम् करूं शकत नाहीं. मी तुम्हांला पुरून उरणार आहें ! भगवान् माझा पाठिराखा व साहाय्यकारी आहे. मग मी भीति कां बाळगावी !

तेव्हां आपण 'शांताकारम् भुजगशयनम्' या प्रार्थनेंचें अचूक मर्म ओळखून वर सांगितल्याप्रमाणें वागण्याचा निर्धार केला पाहिजे. हें जीवन, हा संसार विषारी भुजंगाप्रमाणें ओतप्रोत भरलेला आहे. सर्वत्र अडचणी आणि संकटें ! पुरुषार्थी माणसानें भगवंतावर संपूर्ण श्रद्धा ठेऊन संकटपार व्हायचें आहे. स्वतःच्या सामर्थ्यांवर श्रद्धा ठेवून या जगांत विजयी म्हणून आपण मिरवायचें आहे या गोष्टीचा विसर कधींही होऊं देऊं नका.



# भगवान बुद्धदेव

***********************

लेखक : केशव कृष्ण प्रधान

ज्यांचीं देह मनें तशीच वचनें पुण्यामृतें ओतिलीं ।
ज्यांच्या केवळ स्पर्शानें ढवळुनी पूनीत होते भूमी ॥

**वरील श्लोकातील अक्षर आणि अक्षर सार्थ करून दाखविणाऱ्या अलौकिक विभूती ह्या पृथ्वीतलावर होऊन गेल्या, त्यामध्यें श्री भगवान बुद्धदेवांचें स्थान फारच उच्च आहे, भोंवतालच्या पंचमहाभूतांच्या आवरणास भेदून जड अजडाच्या मधील थेट परमात्म स्वरुपाला फुलवीत भारताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत किंबहुना त्यापलीकडील सिलोन, ब्रह्मदेश, चीन, जपान या प्रदेशापर्यंत ब्रह्म साक्षात्काराचा प्रसार करणारे बुद्धदेव दशावतारांपैकीं एक अवतार गणले जावेत, ह्यात कांहीं नवल नाहीं.**

ग्रीक देवतांतील ऑर्फीयस ज्याप्रमाणें आपल्या तंतू वाद्यानें भोंवतालच्या वातावरणांत दिव्य संगीताचे सूर निर्माण करून आजूबाजूच्या सर्व पशुपक्षांना हिंस्र जनावरांना व मानवाना मंत्रमुग्ध करीत असे असें आपण वाचतों. तेंच वर्णन बुद्धदेवास जास्तच प्रकर्षानें लागू पडतें. असें म्हणतात कीं, ज्यावेळेला बुद्धदेव अरण्यांतून एकटेच ध्यानमग्न स्थितींत वाट क्रमीत असत त्यावेळीं त्यांच्या आगमनाची वर्दी भोंवतालच्या तीन मैलांच्या प्रदेशापर्यंत हवेच्या कणाकणामधून पसरत असे. भगवान सूर्यदेवांच्या सहस्ररश्मीचा सोनेरी प्रकाश उदय पावतांच दूरवर कानाकोपऱ्यापर्यन्त जसा पोहोंचतो, अगदीं त्याप्रमाणें भगवान बुद्धदेवांच्या हृदयांत उदय पावलेल्या चैतन्य सूर्यांचा प्रकाश तीन मैलापर्यंत दूरवर पसरत असे. व त्या तीन मैलांच्या परिसरांतील मानव पशुपक्षी एवढेच नव्हें तर झाडें, वेली वृक्ष किंबहुना भोवतालच्या गवतांतील पात न पात ह्या सुखमय स्थितीचा अनुभव आल्यानें जणू कांहीं आपला श्वास रोखून घेऊन निस्तब्ध बसलीं आहेत, असें वाटत असे. बुध्ददेव होऊन गेल्याला २००० हून अधीक वर्षें झालीं. पण अजूनही वेरूळ, आजिंठा वगैरे इतर ठिकाणी असलेल्या कुठल्याही बौध्द गुंफेमध्यें गेल्यास —विशेषतः ज्या गुंफेत बुध्ददेव वारंवार ध्यानमग्न स्थितींत बसत असत—त्या ठिकाणीं, त्या गुहेंतील

दगडा दगडांमधून बुद्धदेवांच्या संवेदना, सक्षम साधकासमुदां भासल्याशिवाय रहात नाहींत.

## शिकवणुकीचा गाभा

अशा दिव्य अलौकीक व्यक्तिमात्राचें वर्णन करण्यास ब्रम्हस्वरूप लेखणी योग्य आहे. मानवी मनांत जन्मापासून मृत्यूपर्यंत उठणारी विचारांची वलयें व त्यांतून निदर्शन पावणाऱ्या आशा, आकांक्षा, चिंता, धडपडी, भावना कल्पना या सर्वांचा उपशम त्या मनांच्या मागे असलेल्या एका शून्य स्वरूपामध्येंच होतो व त्या शून्य स्वरुपालाच निर्वाणपद म्हणतात. हा बुद्धदेवांच्या शिकवणुकीचा गाभा आहे. मानवी मन हें चांगले वाईट सत्य असते. सौंदर्य कुरुपता, प्रेम, द्वेष यांतच नेहमीं फिरत असते. ह्यातील कुठलेही विचार सत्व, रज आणि तम या त्रिगुणमिश्रीत अवस्थेतच् फिरत असतात. त्यामुळें मनांच्या कोणत्याही अवस्थेमध्यें केवळ शांत निर्व्याज अव्यय असा निरंजन आनंदमय अशा ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देण्याची क्षमता नसते. म्हणून त्या मनांचा जेथें पूर्ण निरास होतो, तेथेंच निर्वाणपद प्राप्ती आहे. हा बुद्धदेवांचा संदेश मानवाला केवळ शून्यवत् करणारा आहे असें वाटल्यामुळें अनुनभवी तत्वार्थ न जाणणाऱ्या विद्वानानीं त्यावर टिकेचा मारा केला. मूलतः मनांचा पूर्ण निराश झाला असतां अनुभवास येणारे शून्यपद चिद्घन असतें. गणितांत समजले गेलेलें शून्य व बुद्धदेवांनीं निदर्शित केलेलें शून्य यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. मानवीं मनाची परीणती मनाच्या निश्चल अवस्थेत एका अमर, अव्यय, प्रशांत, दिव्य, निर्मल अशा प्रकारची झाल्यामुळें त्या स्थितीत मानवी मनांत असलेल्या स्वाभाविक अशा द्वंद वृत्तींचा पूर्ण अभाव असतो. व त्याच स्थितीत मनांच्या पलिकडील चैतन्यास मनामध्यें शिरून मनासच ब्रह्मस्वरूप प्राप्त करून देतां येतें. 'रामरंगी रंगलें मन' किंवा 'मन एव कारणं बंध मोक्षयो !' यांतील मोक्षस्वरूप किंवा 'मन हीच माया' असून माया हेंच ब्रह्म आहे, असें जे म्हणतात तींच स्थिती मनाला प्राप्त होते.

## मनांतील स्थित्यंतर

मनाचे स्थूल मन व सूक्ष्म मन असें दोन भाग आहेत. स्थूल मन म्हणजे आपल्या नेहमींच्या वापरांतील मन. या मनाच्या भागात आपल्याभोंवतीं चालू असलेल्या परिस्थितींत जे जे आपणास अनुभव येत असतात, त्या अनुभवांची आपण आठवण करतों. जसे जसे दिवस मागें पडतात, तसेतसे अनुभव जुने होत मनांच्या सूक्ष्म भागांत उतरत जातात. व स्थूल भगांत नव्या अनुभवांसाठीं जागा करतात. अनुभवांचा अर्थ भोंवतालच्या जगांत वावरत असताना आपल्या स्थूल मनांतील वृत्तींचा होणारा उठाव व परिस्थितीमुळें त्यांत होणारे निरनिराळे

बदल. मनाच्या वृत्तीत फक्त चारच तऱ्हेचे बदल होतात. फार तर ती वृत्ती सात्त्वीक होईल नाहीतर राजकीय होईल किंवा तामसीक होईल किंवा वरील तिन्ही गुणांच्या थोड्याफार मिश्रणानें चवथ्या तऱ्हेची होईल. या शिवाय दुसरा कोणताही फरक मनाच्या वृत्तीत होण्याचा संभव नसतो. कारण मन हे मूलतः त्रिगुणात्मक वृत्तींनेंच बनलेलें असतें. परंतु या वरील प्रकारच्या वृत्तीमध्यें मन इतकें झपाट्यानें फिरतें कीं त्यांत होणारे बदल त्रयस्थासारखे पाहिलें असतांना सुद्धां तितक्या झपाट्यानें लक्षांत येत नाहींत. या वृत्तीत झपाट्यानें बदल होण्याचें कारण म्हणजे मनाला सतत कांहींना कांहीतरी विषय विचारानें हाताळवयाचा असतोच. विषय न हाताळतां निश्चल मनःस्थिती ही कल्पनातीत अशी अवस्था असल्या कारणानें त्या स्थितींत गेल्यास मनाला आपण मानवी जीवन जगलोच नाही असे वाटते. व त्यामुळें मनानेच ही स्थिति दुरापास्त केली आहे. कदाचित् कांहीं वेळ आपोआप मन ह्या निश्चल अवस्थेंत गेल्यास त्यास चिद्घन अशा ब्रम्हस्वरुपाचा आनंद उपभोगावयास मिळतो. परंतु नेहमीच्या विचार अनुभवांच्या सवयीमुळें ही निश्चल स्थिति क्षणार्धांत नाहींशी होते व मन परत पूर्ववत विचारमग्न स्थितींत प्रवेश करतें. एकदां क्षणभर प्राप्त झालेली आनंदमय स्थिति स्मृतीनें परत अनुभवण्यासाठीं मन कितीहि धडपडलें तरी स्मृतीच त्या स्थितीच्या आड येऊन तो अनुभव मनास मिळूं देत नाहीं. व मन परत या द्वंद्वमय विचारांच्या आहारीं जाऊन दीनवाणें होऊन बसतें. मानवी मनाच्या ह्या दुःखाचा परिहार करण्यासाठीं भगवान बुद्धदेवांचा अवतार झाला. बुद्धदेवांच्या भोवतालच्या तीन मैलांच्या परिसरांत वावरणाऱ्या सर्व मानवांना ही मनाला दुरापास्त असलेली स्थिति फक्त बुद्धदेवांच्या जवळपास असल्यानेंच प्राप्त होत असे. व म्हणूनच बुद्धधर्माचा प्रसार इतक्या दूरवर झाला.

## बोधिवृक्ष छायेखालील अनुभव

मनःसमुद्राच्या थेट तळापर्यंत वृत्तीरूप लाटाविरहीत अशी निश्चल शांतता साधता आली तर या मनःसमुद्राच्या खोल खोलें जाणाऱ्या प्रत्येक थरामध्यें एक अनुपम अशी ब्रह्मसंवेदना सर्व सूक्ष्म शरीरला छेदून थेट ब्रह्मस्वरुपापर्यंत जाते व ह्यामुळें शरिरांत साठविलेल्या पूर्वजन्मीच्या सर्व गतस्मृति जागृत होतात. गया येथील अशोक वृक्षाच्याखालीं ध्यानमग्न स्थितींत बसले असतांना बुद्धदेवाला ह्या स्थितीचा लाभ झाला. म्हणून ह्या वृक्षास बोधिवृक्ष असें म्हणतात. हा स्मृति अनुभव इतक्या तीव्रतेनें व प्रकर्षानें त्यांना आला कीं अनेक जन्मापूर्वी हे स्वतः व त्यांची ह्या जन्मातील पत्नी यशोधरा व्याघ्र स्वरुपांत अरण्यांत

फिरत असतांना त्यांना दिसली. या वाघाच्या जोडप्यावर दुसऱ्या एका दांडग्या वाघानें हल्ला केला असतांना, बुद्धदेवांनीं त्याचा प्रतिकार केला. व त्यांच्या शरीरावर ह्या हल्ल्यांत नाना तऱ्हेच्या जखमा झाल्या. तेव्हां यशोधरेनें तिच्या जिभेनें त्या सर्व चाटून बऱ्या केल्या. व त्या जन्मांतच बुद्धदेवाचे व यशोधरेचे एकमेकांवर दिव्य प्रेम बसले. बुद्धदेव सिद्धार्थ नांवाचे राजपुत्र असतांना म्हणजे त्यांच्या संन्यासश्रमापूर्वी जेव्हां त्यांचे यशोधरेशी लग्न झालें तेव्हां जणूं कांहीं या आठवणीमुळेंच यशोधरेनें आपल्या वडिलांकडे लग्नाच्या वेळीं आडवे पिवळे पट्टे असलेली झाडी परीधान करण्याचा हट्ट केला. व तिच्या वडीलांनीही तो आनंदानें पुरविला.

### मनाचा दुचाकी रथ

मन हें कालाचें निदर्शक आहे व तें आपल्या पूर्ण निश्चल स्थितींत कालांतील अवस्थेमध्यें जातें. हें तत्व बुद्धदेवांच्या शिकवणींत पुरेपूर भरलेले आहे. मनाचा रथ दुचाकी असून त्याचें एक चाक म्हणजे 'स्मृति' व दुसरे चाक 'आशा' गतकालांतील स्मृति सतत जागृत करून सुखकारीक स्मृतींतील अनुभव भविष्य काळांत पुन्हां पुन्हां घेण्यास व दुःखमय स्मृति भविष्य काळांत टाळण्यास मन सदैव धडपडत असतें. या त्याच्या धडपडीमध्यें तें वर्तमानकाळाशीं एका बाजूनें भूतकाळ व दुसऱ्या बाजूनें भविष्यकाळ झपाट्यानें सतत जोडीत असताना वर्तमानकाळ नकळत कसा भूतकाळांत सामील होतो, याचें त्याला भान रहात नाही. खरें म्हणावयाचें म्हणजे आपला संबंध सतत भूतकालांत जमा होणाऱ्या वर्तमानकाळाशीं असतो. परंतु आपण या भूतकाळांत जमा होणाऱ्या वर्तमानकाळाकडे दुर्लक्ष करून स्मृती व आशा या दोन अवस्थेमध्यें भांबावून जाऊन या भूतकाळांत जमा होणाऱ्या वर्तमानकाळाचा पुरेपूर उपभोग घेऊं शकत नाहीं. याचा पुरेपूर उपयोग करून खरीखुरी विश्रान्ती आपणांस उपभोगावयाची असेल तर आपण आपल्या मनाचे भांडे हरघडीला पूर्ण रिकामें केलें पाहिजे. विशेषतः त्यांतील भविष्यकाळांच्या आशा व गतस्मृति यांचा पूर्ण निरास केला पाहिजे; परंतु त्यांचा निरास करावयाचा प्रयत्न करून त्यांचा निरास होत नाहीं. तरी त्रयस्थासारखे त्यांच्या मनांतील उद्भवाकडे सतत लक्ष ठेवल्यास व त्यांच्या उद्भवाची कारणें मनापासून शोधून काढल्यास त्यांचा निरास होतो व इतर प्रयत्नाशिवाय मन आपोआप निश्चल स्थितीप्रत जाते.

### समाधि स्थितीचा अनुभव

मनांच्या अशा तऱ्हेनें रिकाम्या झालेल्या भांड्यांत जरी नंतर संवयीमुळे कांहीं विचार आले तरी ते ताजेतवाने व उत्साहदायी असतात. एखाद्या भांड्यांतील बरेच

दिवस पडून राहिलेली शिळी झालेली फुले फेकून देऊन ते भांडे स्वच्छ घासून पुसून मग त्यांत अन्य तऱ्हेची ताजी फुलें ठेवली तर मग जसा त्यास सुंदर वास येतो त्याप्रमाणे मनाची स्थिती होते व पुन्हा पुन्हां वारंवार असेच करीत गेल्यास मनांस निश्चल स्वरूपांत जाण्याचा संबंध होते व हा वेळ वाढूं लागल्यावर त्या स्थितींत मनांत विचारच नसल्यामुळें विचार करणारा जो मी तोच नाहींसा होतो. व ध्यान ध्याता व ध्येय ह्या त्रिपुटीचा पूर्ण निरास होऊन दिव्यत्वाची स्थिती येते व जीस समाधी स्थिती म्हणतात ह्याचा अनुभव येतो.

**मन रिकामें करण्याची कला**

मूल जन्माला आल्यावर व तें मोठे होत असतांना मनांच्या शुभ्र पडद्यावर विचाराच्या लेखणीनें पूर्वजन्मीच्या स्मृती व चालू अनुभव ह्यांनीं संमिश्रीत असे फराटे मारून लिहूं लागणे तें व त्यामुळें वृद्धावस्थेत येईपर्यंत हा मनाचा पडदा चित्रविचित्र रंगानीं जवळजवळ सर्व बाजूंनीं दूषीत होऊन बसतो व ह्यानंतर नवे ताजे विचार नव्या ताज्या कल्पना इतकेंच काय पण नवी सुखमय स्वप्नें बघण्याची क्षमता त्यातून निघून जाते. हा पडदा परीटाकडे नेऊन स्वच्छ धुवून आणावयाचा असल्यास मन रिकामे करण्याची ही बुद्धदेवाची कला आपणांस लवकर साध्य करून घ्यावयास पाहिजे. ही साध्य केल्याशिवाय जीवनाकडे पहाण्याचा नवा दृष्टिकोन आपण ग्रहण करूं शकणार नाहीं. व मनाच्या पडद्यावर नाचणारी पूर्वग्रह दूषीत मधर्के नाहींशीं होणार नाहींत व जन्मभर उराशी बाळगलेली असूया, द्वेष, दुराग्रह यांच्या सावल्या मनाच्या पडद्यावर पडण्याच्या बंद होणार नाहींत. त्यामुळे मनांमागील ब्रम्हस्वरुपाचा दिव्य इंद्रधनुष्याचा अनुभव आपणास येणार नाहीं. मनाचें चक्र एखाद्या विद्वानानें ज्ञानार्जन करून कितीही जोरानें फिरविलें तरी देखील ह्या चक्रांतून ब्रम्हज्ञानांचा प्रकाशच काय पण साधी ठिणगीही दिसणार नाहीं. हाच बुध्ददेवांचा संदेश.

आपणास भगवान येसु खिस्ताच्या Through the nose of the needle Camele can pass but not a man with possesion अशा त्यांच्या उद्‌गारामध्यें निदर्शीत होतो. ज्या मनांच्या स्थितीला जे. कृष्णमूर्ती self awareness म्हणतात किंवा जपानी व चिनी तत्ववेत्ते ज्यास Let go Apale wiwige असे संबोधतात तीही मानवी मनाची पूर्ण निश्चल स्थिती ब्रह्म साक्षात्कार करून देण्यास कशी क्षम आहे हें बुद्धदेवांनी नुसत्या आपल्या तत्वज्ञांनाचीच नाहीतर स्वतः त्या उच्च स्थितीप्रत जाऊन जगाच्या निदर्शनास आणून दिली. त्या स्थितींतच प्राप्त झालेल्या अतिउच्च अनुभवांतूनच बुद्धदेवास निर्वाणपद प्राप्त झालें. परंतु बुद्धदेवानीं त्या निर्वाण पदाचा स्विकार केला नाहीं अशी एक दंतकथा आहे. पहिल्यानें निर्वाण


पदांत पाऊल टाकण्यापूर्वी त्यांनी पृथ्वीतलावरील असंख्य जनसमुदायाकडे एक नजर टाकली. व त्यांच्या संसारांत बुद्ध असलेल्या स्थितीबद्दल त्यांना इतका कळवळा आला कीं जोपर्यंत एकही मानवी जीव ह्या संसारांत बद्ध झालेला आहे तोपर्यंत मी निर्वाणपद स्विकारणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून ते मार्गे परतले. ही दंतकथा खरी असो वा खोटी असो, परंतु मनापासून बुद्धदेवांस शरण गेलेल्या पतीतास अजूनही त्यांच्या प्रतीज्ञेतून निर्माण झालेल्या आश्वासनाचा व आशीर्वादाचा अनुभव येतो.

बुद्धं सरणं गच्छामि !

---


# जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरावतो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, आंबळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एल्. साखरकर

# श्री साई स्तोत्र

---

निराकार अवतार तूं भक्तिसिंधू । देई दयाला तव एक बिंदू ॥
तारील जेणें अजि जीवनौका । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ १ ॥

तीं पंचभूतें तुझ्या दिव्य देहीं । तुझ्यावीण विश्वांत परमेश नाहीं ।
आधार तूझा तूं विश्वज्ञाता । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ २ ॥

तुझ्या क्षीण देहीं कफनी विराजे । फडकें तसें मस्तकीं दिव्य साजे ।
तूं लुंगीधारी साधू विधाता । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ ३ ॥

सत्यम् शिवम् सुंदरं ऐसि भक्ती । तुं ब्रम्ह विष्णू शिवरुपि शक्ती ।
तारी अजी आमुची क्षीण नौका । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ ४ ॥

जेव्हां जगीं दुःख आक्रांत झाला । तदीं पृथ्वीमाजी तव जन्म झाला ।
तुझ्या रामनामें हरी दैन्य दुःखा । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ ५ ॥

तुझ्या पूजनातें करि पुष्पमाला । तुझ्या दिव्य चरणीं मम भाव-माला ।
तुझें तेज कोटी रविचंद्रकांता । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ ६ ॥

तुझी एक शक्ति उजळेल विश्वा । म्हणोन समाधी तुझी घेत श्वासा ।
अशा त्या समाधीस मारोनि हाका । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ ७ ॥

श्री क्षेत्र शिरडी गोदातटाकीं । तशी द्वारकामाई तेथेंच देखी ।
तिथें नित्य धुमसे धुनीमाजि समता । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ ८ ॥

असें तो धनुर्धारि तवरूपि राम । वसें तो तुझ्या देहिं घननीळ शाम ।
तुझ्या चिद्स्वरूपीं पाही अनंता । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ ९ ॥

पैगंबराचें तुझें तेंचि रूप । येशू म्हणोनी नमावे स्वरूप ।
तुं रामरहिमा तुं सर्व चित्ता । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ १० ॥

तुं एक आम्ही जरी कोटी कोटी । वसूं आम्ही तुझ्यांत अवघेचि एकी ।
अम्हा तारणें मारणे ते स्वहस्ता । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ ११ ॥

तुझ्या तत्वसिंधूपरी सर्व धर्म । तुझ्या सत्यरूपी असे सर्व कर्म ।
कलीमाजि अवतार तूझा नियंता । नमो विश्वरूपी श्री साईनाथ ॥ १२ ॥

पाषाण तारिले जसे रामनामें । कितीं उद्धरीले तसें स्वकर्मे ।
अधमांस तारी प्रभो दीनमुक्ता । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ १३ ॥

जसा कृष्णरूपे कुब्जेसि मोक्ष । हरी द्रौपदी तारिली हीच साक्ष ।
तैसी हरावी मम लाज नाथा । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ १४ ॥
हा पिंड अमुचा असे पंचतत्त्व । प्रभू सार तें एक तूझेंच तत्त्व ।
तूझ्या निमित्तें अवघाची आत्मा । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ १५ ॥
जरी आज झाले जग एक यंत्र । ध्वनी त्यात उमटे ' हे नाथ ' मंत्र ।
एका क्षणीं होई स्थिर ही महत्ता । नमो विश्वरूपी श्री साईनाथा ॥ १६
धनधान्य नाहीं तरी याचि गेहीं । जरी संततीचें मज सौख्य नाहीं ।
विश्वांत मी धन्य तूं धांव घेतां । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ १७ ॥
जरी यंत्र उद्योग देई जगाला । परी ते निमित्तेची दुःखी मनाला ।
तुझ्या यंत्रणेनें सुखी होइ जनता । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ १८ ॥
अरे ते नृपाचे लया जाइ राज्य । अशी ती लढाई असो व्हावि त्याज्य
अशांतीस टाकोनि दे श्रीशशांता । नमो विश्वव्यापी श्री साईनाथा ॥ १९ ॥
जरी धर्म गेला तरी कर्म राही । पाखंड सारें जगीं सौख्य नाहीं ।
तुझीया कृपेचा आतां देइ हाता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २० ॥
नको आपपर भाव विसरोनी जगतीं । श्रद्धा असावी तुझी हीच महती ।
तूं आमचा रे उद्धारकर्ता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २१ ॥
नको मोहमाया प्रभो तेचि दुःख । तर्कावितर्कात नाहींच सौख्य ।
प्रभो सन्मतीचा असे तूंचि दाता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २२ ॥
अरे शक्तिहीना तुझी देई शक्ति । तया अंतरी पेटवी ज्ञान भक्ति ।
नको दूर ठेवूं तुझ्या दीनभक्ता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २३ ॥
मला नाहीं तुझ्याविना कोणि बंधू । सख्या मी तुझ्यावीण कोणास वंदू
गळा फांस लागे अरे धांव आतां । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २४ ॥
कसें सौख्य टिकवूं विचारी सुखी तो । परी दीन तुझ्या रूपी सौख्य घेतो ।
तूं सर्व दुनियेंत सुखदुःख दाता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २५ ॥
हें मानवी जीवन व्यर्थ गेले ! जरी मोहमायेंत सारे निमाले ।
तुझ्या एकमायेंत विसरेन चिंता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २६ ॥
तुझा लाडकारे असे मीच बाळ । मातापिता रक्षिती केवि काळ ।
रक्षी मला होउनि तूंचि माता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २७ ॥
भ्रमिलें मला केवळ यौवनानें । कसें कामक्रोधास जिंकूं मनानें ।
या षड्रिपूंचा असें तूंचि हर्ता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २८ ॥

अशा दीन स्थित्यंतरे भीति शंका । शक्ती लया जाइल हीच शंका ।
म्हणोनि मनानें तुला मारि हाका । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ २९ ॥
पहा भाग्यवानू उदयास येतो । तुझ्याविण आधार तो कोण देतो ।
आतां सर्व आशा पुऱ्या होइ नाथा । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥३०॥
दे दर्शनाते जसा भाव भक्ता । कार्यास्तवं कारणरूप धारिता ।
घेऊनि रूपे अनेका अनंता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३१ ॥
करी स्नान जावोनि गोदातटाकी । वंदी समाधी स्वभावें विवेकी ।
धुनी भस्म चर्चील तो भक्त नाथा । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३२॥
ग्रहानें तसें पीडिले रे ग्रहानें । तसे जन्ममृत्यू मला नित्य येणें ।
अशा त्या पिडा हारि दीना अनाथा । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३३
भूतें पिशाच्चें मला पीडिताती । तशी देहपीडा अज्ञान भवंती ।
यावें अशा त्या समयीं अनंता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३४ ॥
नव्या त्या युगाची असे तूंचि शक्ति । तुझ्या शक्तिनें विश्व घेईल मुक्ती ।
नव्या त्या जगाला त्वरे धांव घेतां । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३५ ॥
मला अंतकाळीं प्रभो धीर देई । हृदयांत माझ्या वसती करावी
होईन मृत्युंजय मी नमीता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३६ ॥
गुरु शुक्र रवि रे नमावें तुला मी । संध्या-सकाळी स्मरावें तुला मी
अशा त्या घरीं तूंचि येवोनि वासिता ! नमो विश्वरूपी श्रीसाईनाथा ॥ ३७ ॥
प्रभो जन्म घेवोनि सृष्टी समाधी । गुरुचा गुरु जाहला तूंचि आधी ।
अशा मानवाच्या गुरुदेव दत्ता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥ ३८ ॥
अशी निर्मिली चालिसी साईआज्ञा । कशी करु रे मी तुझी अवज्ञा ।
दे सन्मती चालिसी आठवीता । नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥३९॥
जो नित्य पूजी या चालिसेला । जो नित्य वाची या चालिसीला ।
रक्षी तयाला तो अवतारि दत्ता ! नमो विश्वव्यापी श्रीसाईनाथा ॥४०॥

अनुवादक—**राम तेलंग**



# तपस्वी महावीर

लेखक, पु बा. कुलकर्णी

**जैन धर्मांत नव चैतन्य निर्माण करणारे महान् त्यागी व वीराप्रमाणें आपला देह तरवारेच्या धारेवर धरून उच्च प्रकारची तपस्या करून ईश्वर प्राप्ति करुन घेणारे महावीर यांची पुण्यतिथि गेल्याच महिन्यांत सर्वत्र साजरी झाली. ते गौतम बुद्धाचें समकालीन होते.**

महावीर म्हणजे जैन धर्मियांचें पूज्य दैवत. बुद्ध धर्मांत गौतम बुद्धांना जें स्थान आहे तेंच जैन धर्मांत महावीर यांना आहे. मात्र ते जैन धर्माचे संस्थापक नव्हते. बुद्धाच्या जन्मापूर्वीच जन्मले. म्हणजे त्यांच्या काळास अडीच हजार वर्षें होऊन गेलेली आहेत. तरीहीं रामकृष्णाप्रमाणें महावीरांची जयंती आजही जैनधर्मियांकडून भक्तिभावानें साजरी केली जाते यांतील रहस्य आपण ओळखलें पाहिजे.

गौतमबुद्ध व महावीर एकाच मगध देशांत व त्याच इक्ष्वाकु वंशांत जन्मले. दोघांच्या जन्मांतही कांहीं वर्षांचें अंतर आहे. महावीराचाही जन्म राजघराण्यांत झाला. त्यांचे वडील क्षत्रीयकुंड नामक राज्याचे अधिपती होते.

महावीर हें त्यानीं आपल्या वीरपराक्रमांनीं मागाहून मिळविलेलें गौरवपर नांव; परंतु त्यांचें पाळण्यांतील नांव होतें वर्धमान. बाळपणापासून ते मातृभक्त व पितृभक्त होते. स्वभाव अत्यंत दयाशील. वैराग्याची व एकांतवासाची बालपणापासून आवड. जन्मतःच ते संस्कार बरोबर घेऊन आले होते.

## सर्वांशीं सामना

स्वभाव अत्यंत धाडसी व पराक्रमी. भय कशाला म्हणतात तें त्याच्या गावीं नव्हते. शरीर धट्टेकट्टें. लाथ मारीन तेथें पाणी काढीन ही खंबीर वृत्ती. मनुष्य भीतीनें जेरीस येतो. भय नाना प्रकारचें असतें; परंतु वर्धमानला भय ही काय चीज आहे याची कांहींच कल्पना नव्हती. आठ वर्षांचे असतां बाल सवंगड्यांबरोबर फिरत फिरत जंगलांत गेले. तेथें एका वृक्षाखालीं एक भयंकर साप डोलत खेळत होता. त्याला पहातांच इतर मुलें भराभर पळून गेलीं. वर्धमानानें पुष्पमालेप्रमाणें त्या सापाला अलगत हातांत घेऊन त्याला दूर फेकून दिलें.

शौर्याच्या व पराक्रमाच्या बाबतींत जसा पहिला नंबर तसाच अभ्यासांतही

त्याचा नंबर पहिलाच असे. नवव्या वर्षी त्याला व्याकरण मुखोद्गत होतें. कोणताही विषय असो. तो नजरेखालून जाण्याची खोटी. तो आत्मसात् झालाच म्हणून समजावें.

वर्धमान हां हां म्हणतां वयांत आला. वयोमानाबरोबर त्याचें शरीरसामर्थ्य; पराक्रमवृत्ती व व्यासंग या सर्वांची वाढ होत गेली. आपला बलिष्ट देह हा परोपकारासाठीं आहे. चैनीसाठीं किंवा सुखोपभोगासाठीं नाहीं याची खूणगांठ त्यांनें लहानपणापासून बांधून ठेविली होती. त्याला इतरांप्रमाणें संसाराच्या जजांळांत पडावयाचें नव्हतें. त्यांचें लक्ष संन्यासाकडे झुकत चाललेलें पाहून आईवडिलांस चिंता वाटूं लागली. वर्धमानानें विवाहबद्ध होऊन वैवाहिक सुखाचा आस्वाद घ्यावा असें सहाजिकच त्यांना वाटे; परंतु वर्धमान वेगळया जगांत वावरत होता. मात्र मातेसाठीं त्याचें अंतःकरण तीळ तीळ तुटे. मातेच्या मनाला दुःख होऊं नये म्हणून तो नेहमीं जपे. आणि त्या मातृप्रेमाचाच शेवटीं विजय झाला. आई म्हणे, तुला नको असेल विवाह; परंतु माझ्या मनाचें दुःख कमी करण्यासाठीं व मला आनंद वाटतो एवढ्यासाठीं तरी तूं विवाहास तयार हो !

आपल्या आईनें नेहमीं आनंदांत रहावें व तिला यत्किंचीत्‌ही दुःख होऊं नये यासाठीं डोळ्यांत तेल घालून जपणाऱ्या वर्धमानाला शेवटी हार खावी लागली. केवळ तिच्या समाधानाखातर यशोदा या नावाच्या राजकन्येशीं त्यानें विवाह केला. तिच्यापासून प्रियदर्शना नांवाची एक कन्या झाली. तिचा जमाली नामक राजपुत्राशीं नंतर विवाह झाला. या जमाली जावईबुवांचा उल्लेख पुढें येणार आहेच.

## सर्वस्वाचा त्याग व सन्यास

वर्धमान अठ्ठावीस वर्षांचे असतां त्यांच्या आई वडिलांनीं इहलोकची यात्रा संपविली व त्यांचे वडील बंधू नंदिवर्धन हे राजसिंहासनावर आरूढ झाले.

आपलें जीवन लोककल्याणासाठीं आहे या भावनेनें वर्धमान हे वागत होते. वडिलांच्या निधनानंतर दोन वर्षे संसारधर्म पाळून नंतर सर्वस्वाचा त्याग करून सन्यासाकडे वळण्याचें त्यांनीं ठरविलें. राजघराण्यांत जन्म झालेला ! त्यांना काय कमी होतें ! परंतु आपलें म्हणून जें जें कांहीं होतें तें सर्व त्यांनीं दानधर्मांत वाटून टाकलें. अंगावरील एका वस्त्राशिवाय स्वतःपाशीं कांहीं एक न ठेवतां सर्वांचा निरोप घेऊन ते तपश्चरणासाठीं राजवाड्याबाहेर पडले.

वर्धमान दीक्षा घेऊन घराबाहेर पडले होते. जातां जातां त्यांना वाटेंत एक वृद्ध ब्राह्मण भेटला व कांहीं तरी भिक्षा मागूं लागला. परंतु वर्धमानपाशीं देण्यासारखें काय होते ! जें कांहीं होतें ते देऊन ते मोकळे झालेले होते. होय. त्यांच्या शरिराचें रक्षण करणारें एक मात्र वस्त्र अंगावर होतें. तें विभागून त्याचा अर्धा भाग त्यांनीं त्या ब्राह्मणास अर्पण केला.

## दोन महान् प्रतिज्ञा

एका वस्त्रानिशीं घराबाहेर पडतांना वर्धमाननें दोन महान् प्रतिज्ञा केल्या होत्या. कोणत्याही परिस्थितींत कोणावर रागवायचें नाहीं व कोणाःकडून कितीही गंभीर स्वरूपाचा अपराध घडो, त्याला क्षमा करावयाची. न रागावणें व क्षमाकरण या दोन्ही गोष्टी वाटतात तेवढ्या सोप्या नाहींत. प्रत्यक्ष आचरणांत या दोन्ही प्रतिज्ञा आणणें फार कठीण आहे.परंतु वर्धमानानें हीं दोन्हीं जीवनव्रतें अत्यंत कठोरपणें आचरणांत आणण्याचा निर्धार केला होता. वीरपुरुष मोठमोठाले पराक्रम करतात. जो खरा क्षत्रिय असतो तो विषय मिळविल्यानंतर क्षमाशील होऊं शकतो; परंतु वीर झाला म्हणून काय झालें ! रागाला जिंकण्याचें सामर्थ्य त्याच्या ठायीं नसतें. ज्याच्या ठायीं. पराक्रमाचें सामर्थ्य आहे तो क्षमा कां म्हणून करील ! अशी ही सर्वसाधरणवृत्ती आहे; परंतु वर्धमान पराक्रमी होता व त्याच्याबरोबर त्यानें क्रोधावरही जय मिळविला होता. तो शक्तिसंपन्न असूनही क्षमाशील होता; आणि म्हणूनच **महावीर** या नांवानें पुढें तो सुविख्यांत झाला.

## हालअपेष्टांस आमंत्रण

घराबाहेर पडल्यानंतर महावीरानें सतत बारावर्षें अत्यंत कडक अशा तपश्चरणांत घालविलीं. आपल्या तपस्येला जितकें म्हणून उग्रतर स्वरूप देतां येईल, आपल्या शरीराला जितका म्हणून जास्तींत जास्त त्रास पोहोंचेल व मनावर व शरीरावर जेणेंकरून दुस्सह असे आघात होतील तेवढे शीरोधार्य करण्यासाठीं व त्या सर्वांतून सही सलामत पार पाडून दाखविण्यासाठीं तो बाहेर पडलेला होता. सत्याचा शोध व प्राप्ति ह्या साध्या किंवा सहजसाध्य गोष्टी नाहींत. त्यासाठीं अनंत हालअपेष्टांतून जावें लागतें मन व्याकूळ व्हावें लागतें. सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, हे शब्द उच्चारायला ठीक आहेत परंतु त्यांचें आचरण अतिशय कठीण आहे. महावीरानें दंड ठोकून त्यांचे आचरण करण्याचा निर्धार केलेला होता.

## प्रत्येक बाबतींत स्वावलंबन

महावीरांच्या जीवनांतील तपश्चरणाच्या काळाला आत्यंतिक महत्त्व आहे. त्या काळांत त्यांनीं नसतीं संकटें स्वतःवर ओढवून घेऊन व स्वतःचें जीवन कसोटीला लावून पहाण्याची कमाल केली. कठोर निर्धार करावयाचे व ते कसोशीनें पालन करावयाचे. ज्ञान प्राप्तीसाठीं परकीय सहाय्याची अपेक्षा करावयाची नाहीं. स्वतःच्या पुरुषार्थाच्या व उत्साहाच्या बळावर ज्ञान संपादन करून मोक्ष मिळवावयाचा ही तर त्यांची प्रतिज्ञा होती. दुसऱ्याच्या सहाय्यानें कसली ज्ञान प्राप्ति होणार ! स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं हा त्यांचा ठाम सिद्धांत होता. आपण स्वीकारलेल्या मार्गांत

अनेकांकडून अंतराय आणले जातील व नैसर्गिक संकटपरंपरेलाही तोंड द्यावें लागेल त्यांपासून सुटका करून घेण्याचा बिलकूल प्रयत्न करावयाचा नाहीं. मनुष्य निर्मित किंवा नैसर्गिक संकटें जीं जीं वाट्याला येतील तीं तीं भोगावयाची. हीं संकटें म्हणजे आपल्या पापकर्मांचेंच फळ. तीं आज चुकविली तरी कधीं ना कधीं उभी रहाणारच. मग तीं टाळावयाचीं कशासाठीं? संकट परंपरेतून गेल्यानें चित्तशुद्धि होते. अशा प्रकारचें त्यांचें तत्त्वज्ञान होतें.

## काय ही कठोर तपस्या !

या उद्देशानें त्यांनीं तपश्चकरणाचा बारा वर्षांचा काळ अनन्यसाधारण स्वरूपाच्या संकटांना सामोरे जाण्यांत व त्यामुळें वाट्याला येणारें दुःख निमूटपणें सहन करण्यांत घालविला. जेथें जास्तींत जास्त कष्ट सोसावे लागतील व जास्तींत जास्त संकटें ओढवण्याचा संभव असेल अशा भागांत जाणून बुजून जावयाचें व संकटांशीं सामना द्यावयाचा, हा त्यांचा नित्यक्रम होऊन राहीला होता. जेथें क्रूरपणा, संतद्रोह व निष्कारण पीडा वाट्याला येण्याचा संभव तेथें मुद्दाम जावयाचें. तेथें गेल्यानंतर अन्न पाण्याविना तडफडावें लागे, मार खावा लागे, निंदा सहन करावी लागे ऊन पाऊस यापासून बेसुमार त्रास सोसावा लागे. जेथें वाघ, सर्प यांसारखे प्राणी असतील व जेथें जीवनाला जास्तींत जास्त धोका असेल तेथें वास्तव्य करावयाचें. बारा वर्षांचा काळ त्यांनीं अशा स्थितींत घालविला. धैर्याची, क्षमाशिलतेची व शांत स्वभावाची पूर्ण कसोटी लागली पाहिजे ना ?

वर्धमान हे महावीर पदाला कसे पोहोंचले याची साधरण कल्पना त्यांच्या या संकटांस सामना देण्याच्या वीरवृत्तीवरून येईल. वाघ, साप यासारखे प्राणी पुरवले, परंतु मनुष्यप्राणी हा कधीं कधीं त्यांच्याहीपेक्षां क्रूरकर्मा होऊं शकतो याचे अनेक अनुभव त्यांना या काळांत आले !

## ही कसली दयाशीलता ?

एकदां मोराक या नावाच्या गावीं महावीर फिरत फिरत आले. तेथें त्यांच्या वडिलांचे एक मित्र आश्रम स्थापन करून राहिले होते. आपल्या आश्रमाजवळ एक गवताची झोपडी बांधून देऊन तेथें चातुर्मास घालविण्याची त्यानीं महावीरास विनंती केली. त्याप्रमाणें ते तेथें राहिले. एके दिवशीं कांहीं गाई आल्या व त्यानीं झोपड्यांचें गवत खाऊन त्या फस्त करायला सुरवात केली. इतर तपस्व्यांनीं गाईना हांकून लाविलें; परंतु महावीरानें मात्र त्यांची मुळींच दखल न घेतां ते आपल्या ध्यानांत मग्न राहिले. इतर तापसी संन्याशांना महावीरांची ती दयाशीलता सहन झाली नाहीं. स्वतःची झोपडी डोळ्यांदेखत गाईकडून खावयाची हा काय प्रकार ? त्यानीं कुलपती-

कडे याबाबतींत तक्रार केली. कुलपतींनीं महावीरास ठपका दिला. मग महावीरानीं काय केलें ? आपल्यामुळें दुसऱ्यांस उपसर्ग होतो व सहकाऱ्यांत अप्रीति उत्पन्न होते. हें कांहीं ठीक नाहीं. त्याचवेळीं त्यांनीं पुढील पांच व्रतांचा स्वीकार केला. (१) जेथें राहिल्यानें इतरांत असंतोष उत्पन्न होतो तेथें रहावयाचें नाहीं (२) जेथें रहावयाचें तेथें शरीर प्रकृतीच्या स्वाधीन करून रहावयाचें. त्याच्या रक्षणासाठीं कृत्रिम उपायांची कास धरावयाची नाहीं; (३) सर्वसाधारणपणें मौन धारण करावयाचें; (४) स्वतःच्या हातांनीं जरूर तो स्वयंपाक करावयाचा; (५) स्वतःच्या जरूरीसाठीं दुसऱ्यावर अवलंबून रहावयाचें नाहीं किंवा दुसऱ्याची हांजी हांजी करावयाची नाहीं.

## महावीर दिगंबर कसे बनले ?

आरंभापासून त्यांनीं आपल्या तपस्येचा पाया कठोर आचरणानें घातला. सन्यास ग्रहण करतांच त्यांना दुसऱ्यांच्या मनांतील विचार समजण्याची सिद्धी प्राप्त झाली. त्यानंतर त्यांना अनेक सिद्धि प्राप्त होत गेल्या; परंतु त्यांचें त्यांनीं केव्हांहि अवडंबर माजविलें नाहीं.

त्यांच्या अंगावर अर्धे वस्त्र असे. एकदां जंगलांतून जात असतां काट्यांत गुरफटून तें वस्त्र फाटलें. त्याचा त्यांनीं त्यावेळीं त्याग केला तो कायमचाच. त्यानंतर आयुष्याच्या अंतापर्यंत ते दिगंबर स्थितींत वावरत असत.

जैनांत दोन पंथ आहेत. वस्त्रासहीत महावीरांची उपासना करणारे ते श्वेतांबर व वस्त्रविरहीत महावीरांची उपासना करणारे ते दिगंबर. सध्यांच्या काळांत मात्र दिगंबर पंथाचे जैन साधू क्वचित्‌च आढळून येतात.

महावीर अनेक संकटांतून व दुःखातापांतून गेलें; परंतु त्याना सर्वांत जास्त त्रास भोगावे लागले ते बंगालमधील लाढ नामक प्रदेशांत असतांना. त्या भागांतील लोक आत्यंतिक आसुरी वृत्तीचे असल्याचें ऐकून ते त्या भागांत मुद्दाम जाऊन राहिलें होते. त्यांना प्रसिद्धी बिलकूल सहन होत नसे. जनतेपासून ते दूर रहात असत. एकाच ठिकाणीं दीर्घकाळ रहाण्याचें ते टाळीत असत. जेथें मान सन्मानाचा संभव आहे तेथून पळावयाचें, हा त्यांचा खाक्या होता. परंतु ते कोठेंही असले तरी आपल्या तपस्येच्या सुंगधानें ते जनतेकडे आपोआप खेचले जात असत. तुमच्या अंगच्या थोरपणाचा सुंगध दडवून का रहाणार आहे ? तुमच्या मनांत असो वा नसो, जनता तुमच्याकडे खेचली जाणार व तुमचे देव्हारे माजविणार ! महावीरांच्या बाबतींत तसाच प्रकार होऊं लागला होता.

## तपस्येचा काळ संपता संपता—

त्यांची बारा वर्षांची तपश्चर्या संपत आलेली होती; • शवटीं शेवटा

त्यांना अधिकाधिक दुःखें सहन करांवीं लागलीं. दुःखांना आमंत्रणच द्यावयाचें; मग ती कां नाहीं तुमच्याकडे धांव घेणार!

एकदां एका गांवीं जनवस्तीपासून दूर अशा एका वृक्षाखालीं ते ध्यानस्थ बसले होते. इतक्यांत कोणी एक गुराखी भटकत त्या भागांत आला. तेथून कांहीं जरूरीच्या कामानिमित्त त्याला दुसरीकडे जावयाचें होतें. यासाठीं आपल्या गुरांची राखण महावीरावर सोपवून तो गुराखी निघून गेला. महावीर आपल्या ध्यानांत मग्न! त्यांनीं गुराखी काय म्हणाला तें ऐकलेंसुद्धां नव्हतें. गुराख्याला वाटलें बसल्या बसल्या हा भला गृहस्थ करील आपल्या गुरांची राखण! शिवाय होय नाहीं ते कांहींच म्हणाले नव्हते. मौन म्हणजे संमती असें गृहीत धरून तो चालता झाला!

कांहीं वेळानें परत येऊन पाहातो तों काय? गुरांची दाणादाण झालेली! गुरें कुठें गेलीं त्याची दाद लागेना. यामुळें तो गुराखी चिडला. त्यानें एक खुंटी घेतली व महावीराच्या कानांत ती ठोकून ठोकून मारली. महावीरानीं प्रतिकार केला नाहीं. परिणाम काय झाला? कानांतून एकसारखें रक्त वहांयला लागलें. वैद्यराजाला औषधोपचार करावा लागला व शरिराला ज्या असह्य वेदना झाल्या, त्यांचें वर्णन करणें कठीण!

महावीरांची तपस्या किती कठीण व कष्टप्रद होती याची यावरून सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे.

महावीरांची कठोर तपस्या संपली त्यावळीं ते जांमक या नांवाच्या गावांजवळील घोर अरण्यांत होते. तेथें वैशाख शुद्ध दशमीला त्यांना दैवी साक्षात्कार झाला. ज्याच्यासाठीं घरदार सोडून ते बाहेर पडले तें दिव्य ज्ञान त्यांना प्राप्त झालें.

## महावीरांची उदात्त शिकवण

जांभक या गांवीं आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर ज्ञानी महावीर आपण मोठ्या कष्टांनीं संपादन केलेलें ज्ञान जनतेला देण्यासाठीं बाहेर पडले. आतां यानंतर त्यांच्या तत्त्वज्ञानाचा थोडासा परिचय येथें करून द्यावयाचा आहे. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, अस्तेय व अपरिग्रह यांच्या सहाय्यानें मोक्षप्राप्त होतो. मोक्षप्राप्तीचीं हीं मुख्य साधनें आहेत हा त्यांनीं जनतेला दिलेला उपदेश. स्वानुभवानें पारखून घेतलेलीं हीं महान् तत्त्वे

सर्व धर्मांचें एकमेव व मूलभूत तत्त्व म्हणजे दया हेंच होय. 'दया धरमका मूल है.' परंतु या थोर तत्त्वाचा पूर्ण साक्षात्कार होण्यासाठीं क्षमा, नम्रता, सरळता, पवित्रता, संयम, संतोष, सत्य, तप, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या दहा तत्त्वाची कास धरली

पाहिजे. म्हणजे तीं दहाही तत्त्वें अंमलांत आणण्यासाठीं झटलें पाहिजे. असें का ? त्यासाठीं थोड्या स्पष्टिकरणाची जरूरी आहे.

( १ ) क्षमा, ज्याच्याठायीं क्षमा बाणलेली आहे त्याला दया उत्तमप्रकारें प्रगट करतां येणार नाहीं. क्षमा करण्याची आपली नेहमीं तयारी असली पाहिजे. 'क्षमा वीरस्य भूषणम्' क्षमाशील मनुष्यच दयाधर्माचें पालन करूं शकेल.

( २ ) सर्व गुण विनयाच्या आधीन आहेत. विनयानें गुणांना तेज चढतें. आणि विनयाचा जन्म नम्रतेपासून होत असतो. जो नम्र असतो तो सर्वगुणसंपन्न असतो. 'नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता' असें म्हणतात तें कां उगाच ?

( ३ ) मनुष्य मनानें सरळ पाहिजे. त्याशिवाय तो शुद्ध होऊं शकत नाहीं. अशुद्ध जीवाला धर्माचे पालन करतां येणार नाहीं. धर्माशिवाय मोक्ष नाहीं व मोक्षाशिवाय सुख नाहीं.

## पावित्र्य ही मोक्षाची पायरी

( ४ ) सरळ वृत्तीच्या मनुष्याच्या ठिकाणींच पावित्र्य संभवतें. आपलें आचरण, वागणें व बोलणें सवरणें सर्व पवित्र पाहिजे; पवित्रता ही मोक्षाची एक पायरी आहे.

( ५-६ ) संयम पाळण्याचें महत्व काय सांगावें ? पदोपदीं बेतालपणें वागण्याचे प्रसंग उद्भवतात. विषय सुखाकडें व भोगांकडे मन खेंचलें जातें. त्यावर ताबा ठेवणें अत्यंत जरूर आहे. आणि जो संयमानें वागेल त्यालाच संतोष प्राप्त होईल. संयमी जीवन आनंददायक असतें. संयम व संतोष ही जोडी आहे.

( ७ ) शारिरीक, मानसीक व वाचीक या तिघांचीही सांगड घालून सत्याचरण करणें, असत्य वाचेनें न उच्चारणें, मनांतही खोटा विचार येऊं न देणें व कोणत्याही प्रकारच्या फायद्याला मुकावें लागलें तरी सत्य तेंच कथन करणें हा नेमधर्म पाळण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे.

( ८ ) तप या शब्दाची व्याप्ति फार मोठी आहे. रोजच्या आहारांत चार घांस कमी घेणें ही साधी गोष्ट आहे. खाण्यांत नियम बद्धता व संशय पाहिजे. जिव्हेचे चोचले चालू द्यावयाचे नाहींत. थंडी, ऊन व पाऊस कोणत्याही परिस्थितींत समाधान वृत्तीनें रहातां आलें पाहिजे. बाह्य तपाचे हे सारे प्रकार आहेत. तसेंच प्रायश्चित, ध्यान, सेवा, विनय, स्वाध्याय हें अभ्यंतर तपाचे प्रकार आहेत. या सर्व प्रकारच्या तपश्चरणांतून साधनानें पार पडावयाचें असतें.

( ९ ) देहानें, मनानें व वाचेनें ब्रह्मचर्य व्रताचें पालन साधकाला साध्य झालें पाहिजे. कोणत्याही साधनेंत ब्रह्मचर्याला अग्रस्थान द्यावें लागेल.

( १० ) निस्पृहतेची वागणूक म्हणजेच अपरिग्रह.

धर्माचरणाचे हे दहा नियम आहेत. यांचें जो कोणी पालन करील त्याच्यापासून भीती, राग, द्वेष आपोआप पळून जातील, व त्याला ज्ञानाची प्राप्ति होईल. आणि तेंच तर आपलें ध्येय आहे.

## अहिंसा धर्म

अहिंसेसारखा परम श्रेष्ठ धर्म नाहीं. अहिंसा परमो धर्मः असें महावीर मानतात. अहिंसेवर त्यांनीं आत्यंतिक भर दिलेला आहे. जन्मल्यापासून तों मरेपर्यंत नाना दुःख तापांतून प्राण्याला जावें लागतें. जन्म घेतांना व मरतांना थोड्या थोड्या का यातना होतात ! परंतु प्रत्येक मानवाला सुख प्रिय असतें. त्याच्यासाठीं तर धडपड चाललेली असते. तुला असें सुख प्रिय तसेंच तें इतर प्राणीमात्रांनाही प्रिय असतें याचा कधीं विचार तुझ्या मनांत आला आहे काय ? तुझें सुख तवढें तुला दिसतें ! तेव्हां हा विचार करून दुसऱ्यांना कोणत्याही रीतीनें दुःख द्यावयाचें नाहीं, हत्या करायची नाहीं, प्रहार करावयाचा नाहीं, वाग्बाण सोडायचा नाहीं, मर्मभेदक बोलावयाचें नाहीं, दुसऱ्यावर हुकमत चालवायची नाहीं. दुसऱ्याची वस्तू हिरावून घ्यावयाची नाहीं. दुसऱ्याचे मोफत श्रम घ्यावयाचे नाहींत. अशा रीतीनें वागण्याची आहे तुमची तयारी ?

प्रत्येक मनुष्यापुढें नेहमीं युद्धाचे प्रसंग पदोपदी उभा रहात असतो. दुसऱ्याबरोबर युद्ध कशाला ? स्वतःच्या हृदयांत जे शत्रू तळ देऊन बसले आहेत त्यांच्यांशीं लढतां लढतां तुमचा जीव मेथाकुटीस येईल. रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग—' असें म्हटलें आहे तें उगाच नाहीं !

## पहिले अकरा शिष्य

महावीराच्या उपदेशाची एवढ्यावरून सर्वसाधारण कल्पना येण्यासारखी आहे. महावीराचा उपदेश प्रमाण मानून त्याचा प्रचार करण्यासाठीं झटणारे पाहिल्या प्रथम अकरा शिष्य लाभले होते. ते सर्व गौतम गोत्री ब्राम्हण होते. तसेंच ते थोर कुळांत जन्मलेले होते. ते स्वतः तपस्वी, निरंहकारी व थोर पदाला पोहोंचलेले होते. महावीराच्या सान्निध्यांत आल्यामुळे त्यांचें कोटकल्याण झालें. जैनधर्मांत त्यांच्यामुळें नवचैतन्य निर्माण केलें.

महावीरापूर्वी जैन धर्माचें अस्तित्व होतें व त्या धर्मांत मोठेमोठे तर्थिंकर होऊन गेले. महावीर हे अखेरचे तर्थिंकर होत. त्यांनीं जैन धर्मांत नवचैतन्य व नवीन प्राण ओतला त्या धर्माची प्रतिष्ठा त्यांनीं किती तरी पटीनें वाढविली हें निःसंशय होय. तत्कालीन अनेक राजेरजवाडे व महाराण्या महावीराच्या महा तेजानें दिपून गेल्या

व त्यानीं जैन धर्माची दीक्षा घेतली. असंख्य स्त्री पुरुषांनीं त्यांचा उपदेश ग्रहण करून सन्यास धर्माची दीक्षा घेतली. त्या धर्मात मांसाहाराला स्थान नाहीं.

संसाराचा त्याग करून सन्यास घेणाऱ्यांत महावीराचे जावई जमाली व कन्या प्रियदर्शना यांचाही समावेश होतो. परंतु नंतर महावीर व जमाली यांच्यामध्यें कांहीं कारणानें मतभेद उत्पन्न होऊन जमालीनें एका नवीन पंथाची स्थापना केली.

**तेजस्वी जीवन :—**

वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत निरनिराळ्या भागांत फिरून महावीर जनतेंत ज्ञान प्रचारासाठीं झटले. त्यांच्याकाळीं पार्श्वनाथ तीर्थंकराचा सांप्रदाय चालू होता. त्यानंतर पार्श्वनाथ व महावीर पंथीयांनी आपसांत मतभेद मिटवून जैनधर्माला एकरूप व सुसंघटीत स्वरूप आणिलें. महावीर हेंच शेवटचे तीर्थंकर अशी सर्व जैन धर्मियांनीं मान्यता दिली. आणि गेल्या अडीच हजार वर्षापासून महावीरांचे स्थान त्या धर्मात सर्वतोपरी अजोड होऊन राहिलें आहे.

महावीरांना मानसन्मानाचें वावडें होतें. त्यानीं आयुष्यभर कठोरपणें व्रतपालन केलें. जें व्रत घेतलें तें पालन करीत असतां कितीही संकटें भोगावीं लागलीं तरी त्याची तमा त्यानीं बाळगिली नाहीं, त्यांचें वर्तन व सारें जीवन स्फटिकाप्रमाणें शुभ्र, पारदर्शक तसेंच ते तेजस्वी होतें. त्यानीं आचरिलेल्या उग्रतर तपस्येचे तें मधुर फळ होतें. अशा या वीराग्रणीनें वयाच्या ७२ व्या वर्षी आपली जीवितयात्रा संपविली.

———


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# कंबण रामायणांतील शूर्पणखा

बागेत एखादें गाढव शिरावें आणि त्याला काठीनें बडवून घालवून द्यावें, तशीच राम—लक्ष्मणांनीं शूर्पणखेची वाट लावली. वाल्मीकींनीं हा प्रसंग अतिशय संक्षेपणानें आणि त्रोटकपणें वर्णिला आहे.

तामिळ कवि कंबण यानें ही घटना विस्तृतपणें सांगितली असून, तसें करतांना त्यानें मूळ कथावस्तूहून पुष्कळ स्वातंत्र्यहि घेतलें आहे.

वनविहार करतां करतां राम–सीता एका नदीच्या कांठाशी आली. तेथें डुंबत असलेल्या एका हंस पक्षाकडे रामाचें लक्ष गेलें. त्या हंसाच्या पोहण्यांत आणि सीतेच्या चालींत असलेलें विलक्षण साम्य पाहून त्याला मोठी मौज वाटली आणि तो स्वतः-शींच हसूं लागला. त्याचवेळीं नदीवरून परतणाऱ्या एका हत्तीनें सीतेचें लक्ष वेधून घेतलें आणि त्याच्या चालीचें रामाच्या चालीशीं असलेलें साम्य पाहून तीहि प्रसन्न चित्तानें गालांतल्या गालांत हसूं लागली.

गोदावरीच्या परिसरांत पंचवटीमध्यें असे प्रीती–निर्झर दुथडी भरून वाहात होते. तेवढ्यांत नियतीनें कामवासनेबरोबर कट करून शूर्पणखेला रामाची भेट घेण्यासाठीं पाठविलें.

क्षीरसागराचा त्याग करून भगवान् विष्णु दशरथनंदनाच्या रूपानें देवांच्या शत्रूंचें निर्मूलन करण्याच्या उद्देशानें या अवनीतलावर अवतरले होते. पण शूर्पणखेला याची कुठली कल्पना असणार ?

रामाचें लावण्य पाहून ती अगदीं वेडी होऊन गेली. " हा मन्मथ आहे की इंद्र आहे ? शिव आहे कीं विष्णु आहे ? पण मन्मथ तर अनंग आहे इंद्र सहस्त्रनयन आहे. शिवाच्या भाळीं तृतीय नेत्र आहे आणि विष्णु चतुर्भुज आहे. हा इंद्र शिव किंवा विष्णु यांपैकीं कुणीहि असणं शक्य नाहीं.

शिवानं मन्मथाचं भस्म करून टाकलं असलं तरी आपल्या तपश्चर्येच्या बळावर त्यानें आपला देह पुन्हां प्राप्त करून घेतला असला पाहिजे.

" पण हा मन्मथ असेल तर यानें वल्कलें कां धारण केली आहेत ? या कमल नयन युवकाने आपलं आयुष्य तपश्चरणांत व्यतीत करावं याचा अर्थ काय ? "

तिचे डोळे रामावर खिळून गेले होते. तेवढ्यांत तिच्या मनांत विचार आला. ‘ माझं हे हिडीस रूप पाहून माझ्याविषयीं त्याच्या मनांत तिटकारा उत्पन्न होईल. त्यापेक्षां रूप बदलूनच त्याच्याकडे जावं हे बरं. ’

मग तिनें एका सुंदर युवतीचें रूप धारण केले आणि पौर्णिमेच्या चंद्रासारखी ती रामासमोर येऊन उभी राहिली. नंदनवनांतील कल्पवृक्षाला आलिंगन देणाऱ्या सुवर्णलतिकेसारखी तिची काया नाजूक दिसत होती. तिच्या सुभग ओठांना आणि दंतपक्तींना हरणांच्या डोळ्यांची जोड मिळाली होती.

तिची चाल मयूरासारखी होती. तिच्या पायांतील पैंजण छुमछुमत होते. रामाने वर पाहिले आणि त्याची दृष्टि त्या रूपगर्वितेवर पडली. शूर्पणखेनें खालीं वाकून त्याच्या चरणांचा स्पर्श केला. मग लाजेनें चूर होऊन डोळ्यांवर हात घेत ती किंचित मागें सरली.

रामाला वाटलें, ही सुंदरी दूरच्या कोठल्या तरी प्रदेशांतून आली असली पाहिजे. म्हणून त्यानें विचारलें, “ कूठून आलीस तूं ! नांव काय तुझं ! कुठल्या कुटुंबांतील तूं !

ती म्हणाली, “ ब्रम्हदेवाच्या नातवाची मी कन्या. कुबेराची मी बहीण. कैलासाचा विजेता रावण हाहि माझाच भाऊ. मी कुमारी असून माझं नांव आहे कामवल्ली. ”

“ आपल्या मनाची व्यथा बोलून दाखवावी, हें कुलवती स्त्रीला शोभत नाहीं. पण असं असलं तरी आज मला स्तब्ध राहून चालणार नाहीं. कामदेवानें माझं हृदय जिंकून घेतलं आहे. केवळ तुम्हीच मला यांतून वांचवूं शकाल. ”

“ तूं माझ्याशीं गांधर्वविवाह कर. परस्परांवर प्रेम करणारे दोन जीव या रीतीनें एकत्र येऊं शकतात, हें तुला विदित आहेच. आपला विवाह झाला, कीं सुख आपल्या घरीं पाणी भरूं लागेल; इतकंच नव्हे तर माझा भाऊ रावण आणि तूं त्याचा स्नेहहि अनायासेच जुळून येईल. तूं या अरण्यांत असा एकटा रहात आहेस असं पाहून राक्षस तुला त्रास देऊं लागतील. तूं आपणहून त्यांच्याकडे गेला नाहींस तरी तूं वल्कलं धारण केलीं आहेस एवढं कारण त्यांना सहज पुरेल. तूं माझ्याशीं विवाहबद्ध झालास तर ही विवंचना तुला उरणार नाहीं. इतकंच नव्हे तर माझ्या बाजूचे अनेक सामर्थ्यशाली लोक तुझ्या सेवेसाठीं तत्परतेनें धावून येतील. नीट विचार करून पाहा. ”

आपली कामवासना पूर्ण व्हावी यासाठीं शास्त्राचा आधार देऊन आणि रामाचें मन वळविण्याचा पुनः पुन्हां प्रयत्न करून शूर्पणखा त्याची आळवणी करीत होती.

राम हसला. तेवढ्यांत लतिकेसारखी सुंदर दिसणारी सीता तेथें आली. तिचें डोळे दिपविणारें लावण्य पाहून शूर्पणखा तिच्याकडे दिङ्मूढ होऊन पाहातच राहिली.

ती कोण आहे याची कांहींच जाणीव तिला नसल्यामुळें आणि कामवासनेची धुंदीहि चढलेली असल्यामुळें, सीतेला पाहातांच क्रोधायमान झाली आणि रामाला उद्देशून म्हणाली, "मनुष्यरूप धारण केलेली ही राक्षसीण आहे. तुला फसवून आपल्या जाळ्यांत ओढण्यासाठीं ती इथें आली आहे, हें दिसतं आहे. तें तिचं खरं रूप नव्हे. कच्च मांस खाणारी ही लावसटीण आहे. तिला इथून हांकलून दे. तिच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं नकोस."

राम हसत हसत उत्तरला, "फार चाणाक्ष दिसतेस तूं! तसं नसतं तर ही कोण आहे हें तूं अचूक हरूं शकली नसतीस!"

एव्हांना सीता रामाजवळ येऊन उभी राहिली होती. राम कां हसतो आहे, हें शूर्पणखेच्या लक्षांत येत नव्हतें. कामवासनेंच्या भरांत तिचें सारें भानच हरपून गेल्यासारखें झालें होतें. सीतेच्या अंगावर खेंसकून ती म्हणाली, "राक्षसिणी, माझ्या प्रियकराशीं काय काम आहे तुझं? चल, चालती हो इथून!"

या अकस्मात् प्रकारानें भांबावून जाऊन आणि घाबरून सीता रामाला बिलगून उभी राहिली. पावसाळी मेघाला वीज बिलगावी तशी!

झाली तेवढी मौज पुरी झाली असा विचार करून राम म्हणाला, 'हे वनिते! माझ्या तापट स्वभावाच्या भावाच्या कानावर तुझं बोलणं पडण्यापूर्वीच तूं गप्प झालीस तर बरं होईल. जेवढ्या लवकर इथून तुला काढता पाय घेतां येईल तेवढं तुझ्या दृष्टीने तें सुरक्षितपणाचें होईल.' आणि असे बोलून तो सीतेसमवेत पर्णकुटींत गेला.

कामवासनेनें धगधगत राहिलेल्या त्या राक्षसिणीनें ती रात्र कशीबशी काढली. सकाळ होतांच तिनें विचार केला, "हा पुरुष मला लाभला नाहीं तर मी गतप्राण झाल्याशिवाय राहात नाहीं, ही बला त्याच्यासमवेत आहे तोंवर तरी तो आपल्याकडे ढुंकूनहि पाहाणार नाहीं, कांहींहि करून आपण तिचं अपहरण करायला पाहिजे." असा विचार करून ती पुन्हा रामाच्या आश्रमापाशीं येऊन ठेपली.


प्रातःप्रार्थना करण्यासाठीं राम नदीवर गेला होता. सीता आश्रमांत एकटीच होती. शूर्पणखेला वाटलें, ही संधि बरी आहे. आतां हिचें अपहरण करायला हरकत

नाहीं. लक्ष्मण जवळच रानांत आहे हें तिला माहीत नव्हतें. तिनें सीतेवर झडप घातली आणि तेवढ्यांत लक्ष्मणानेंहि शूर्पणखेवर झेंप घेतली. तिचा केससंभार धरून तिला लत्ताप्रहार करूं लागला आणि अखेर त्यानें आपल्या खड्गाला हात घातला.

तत्क्षणींच शूर्पणखेनें आपलें मूळचें भयानक स्वरूप धारण केलें. लक्ष्मणानें तिचें नाक कापून तिला हांकलून दिलें.

रक्तबंबाळ होऊन ती धावत धावतच आपला भाऊ खर याजकडे आली आणि ओरडूं लागली, "खरा, रावणा, इंद्रजिता! हे राक्षसवंशाच्या राजानो! अरे तुम्हांला कांय काळझोप लागली आहे कीं काय? एका क्षुद्र मानवानें माझा अपमान करून मला विद्रूप करून टाकलं आहे. अरे, माझा आक्रोश तुम्हांला ऐकूं येत नाहीं कीं काय?" अशा कर्णकर्कश किंकाळ्या मारीत ती सैरावैरा धावत होती.

कंबणानें शूर्पणखेची कथा अशा रीतीनें रंगावली आहे. स्वतःचे खरे स्वरूप लपवून आणि एका लावण्यवतीचे रूप घेऊन शूर्पणखा रामापाशीं येते आणि त्याला आपल्याकडे आकर्षित करूं पहाते. एका अर्थानें वाल्मीकींच्या वर्णनांत कांहीं तरी कमी पडत आहे, कारण वाल्मीकींनीं शूर्पणखेचे वर्णन कामरूपी असे केले आहे. कामरूपिणी म्हणजे स्वतःच्या इच्छेनुसार रूप धारण करणारी. वाल्मीकींच्या वर्णनांत कांहींतरी कमी पडत आहे असे वाटल्यावरूनच कंबणाने हे स्वातंत्र्य घेतले असावे हे उघड आहे. पाशवी वासना प्राणिमात्राला कशा प्रवृत्त करतात हे दाखविण्यासाठींच त्यांनीं हा जणूं बदल केला आहे.



# कांहीं अध्यात्मिक प्रश्नोत्तरें

*************************

**प्रश्न :** समुद्रापासून अनेक लहरी उत्पन्न होतात आणि पुन्हां त्यांतच विलीन होतात आणि त्याचप्रमाणें अशा कोणत्या अणूपासून कोट्यावधि ब्रम्हांडें उत्पन्न होतात आणि त्यांतच विलीन होतात ?

**उत्तर :** ज्याप्रमाणें बीजाच्या अंतर्यामीं वृक्ष असतो त्याप्रमाणें त्या परम चित् अणूपासून सदसद्रूपानीं उद्भवणारीं अनेक जगें स्फुरण पावतात आणि त्या मध्येंच तीं विलीन होतात.

**प्रश्न :** तमोरूप आणि स्वयंप्रकाश असा हा चित् अणु कसा ओळखावा, त्याचें ज्ञान कसें मिळवतां येईल ?

**उत्तर :** या परमचित् अणूचें वर्णन एखादें वेळीं करतां येईल पण त्याची व्याख्या आणि सत्य-दर्शन शब्दांत घडवतां येणार नाहीं. वस्तुजात जीवनाची मीमांसा करून हें सत्य दर्शन होणार नाहीं. सत्-चित्-आणि-गर्भ असलेलें हें ज्ञान क्रियात्मक आहे. व्याकरणांत कर्ता, कर्म आणि क्रियापद वेगवेगळे दाखविता येतात—तसें या ज्ञानाचें व्याकरण करता येणार नाहीं. कर्ता, कर्म आणि क्रियापद या तिहींचा एकजीव ज्या क्षणीं होतो तेव्हांच ही विराट अनुभूति मिळते- द्रष्टा, दृश्य आणि दर्शन; सुवर्णकार, सुवर्ण आणि अलंकार या तिहींचा एकाच अर्थबिंदूत जेव्हां लोप होतो तेव्हांच ही अनुभूति मिळते.

**प्रश्न :** सत् म्हणजे ?

**उत्तर :** जें त्रिकालाबाधीत होतें, आहे आणि राहणार तें चराचर !

**प्रश्न :** चित् म्हणजे ?

**उत्तर :** त्या चराचराचें ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञान !

**प्रश्न :** आणि आनंद म्हणजे ?

**उत्तर :** तें ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञान मिळविल्यानें देहाला आणि जीवाला आलेली सहजावस्था !

**प्रश्न :** म्हणजे देह आणि जीव या दोन वेगळ्या वस्तू आहेत काय ?

**उत्तर :** देह म्हणजे ज्ञानेंद्रियांनीं आणि कर्मेंद्रियांनीं युक्त असलेलं यंत्र, त्याला देह म्हणतात. पण जीव हा तें यंत्र चालविणारा यांत्रिक.

**प्रश्न :** मग यंत्र बिघडते आणि नंतर बंद पडते तेव्हां हा यांत्रिक कुठें जातो ?

**उत्तर :** कुठें जातो ? क्षमा करा, फार अवघड आणि आम्हाला न पेलणारा प्रश्न आहे हा !

**प्रश्न :** देहाच्या वासना आणि क्रियात्मक बुद्धी ही स्वयंसिद्ध असते का ? त्या वासना आणि क्रियात्मक बुद्धि निर्माण करणारा कोणी तो देहातीत असतो ?

**उत्तर :** तो देहातींत नसतो, देहांतच त्याचें वास्तव्य असते, तो सर्व देहाच्या अणू रेणूंत अधिष्ठित असतो,

**प्रश्न :** अर्धांगवायूनें हात लुळा पडतो, त्याची क्रियात्मक शक्ति नष्ट झालेली असते. अशावेळीं ' हा ' कुठें असतो ?

**उत्तर :** ' हा ' तिथेच असतो—पण अचेतन स्वरुपांत राहतो.

**प्रश्न :** म्हणजे त्याच्या सचेतन आणि अचेतन अशा दोन अवस्था असतात काय ?


**उत्तर :** प्रत्येक चित् अणूच्या या दोन अवस्था असतात ! पण या दोन्ही अवस्था म्हणजे नाण्याच्या दोन बाजवा. वस्तू आणि तिची सावली किंवा प्रतिबिंब एक सचेतन आणि एक अचेतन असते त्याप्रमाणे.

**प्रश्न :** सचेतन आणि अचेतन आत्म्याचे ज्ञान कसे होते, त्यांतला भेद कसा ओळखतां येतो—

**उत्तर :** योगसाधनेने.

**प्रश्न :** योगसाधना म्हणजे प्राणावर विजय मिळवणे.

**उत्तर :** प्राणशक्तीचें संपूर्ण क्रियाशील ज्ञान, विज्ञान आणि तत्वज्ञान म्हणजे योगसाधना.



# दृष्टांत

आज म्या डोळा साईंबा पाहिले
नेत्र माझे धन्य झाले ॥ धृ ॥

दुःखाच्या ओझ्यानें जेव्हां
गेले होते मी भारावून
येऊन स्वप्नीं मज साईंनी
आश्वासन दिधले ॥ १ ॥

येवोत आतां कितीक संकटें
साईरूप पाहिलें गोमटे
पाठीवरती हात फिरवुनी
उदि आशिर्वच दिधलें ॥ २ ॥

खरोखरी परि नव्हतें ध्यानीं
भेटतील मज बाबा स्वप्नीं
आजवरी भक्तांना असले
दिधले किती दाखले ॥ - ॥

तशीच हातीं उदी देऊनी
सुखी रहा तूं मजला स्मरुनी
म्हटलें सत्यच श्री साईंनीं
त्या पायांची किंकर झालें ॥ ४ ॥

—सौ. श्री. राहाणे

———

# ह. भ. प. दासगणू महाराज

************************

## पोलिस खात्यांतील नोकरी

श्रीदासगणूंच्या मावशीचे यजमान श्री. बळवंत सदाशिव गोडबोले हे बडोद्यास मुन्सफ होते. शाळा सोडल्यावर जरा थारेपालट म्हणून श्रीदासगणू तिकडे गेले. आपल्या या भाच्यालां उद्योगास लावावें, या हेतूनें श्री. गोडबोले यांनीं खाजगीकडील एका खात्यांत दासगणूंना स्वतःच्या वशिल्यानें प्रवेश मिळवून दिला. पण आखीव कामाचा कंटाळा आणि संस्थानांत अत्यंत वावडा असलेला स्पष्टवक्तेपणा, यामुळें बडोद्यासहि विशेष जमलें नाहीं. आठ नऊ महिन्यांतच नोकरीस रामराम ठोकून दासगणूंची स्वारी मायभूमीस परत आली. याच सुमारास शके १८१३ मध्यें जामखेड तालुक्यांतील बोरले अष्टयाचे जहागीरदार नारायणराव रानडे यांच्या कन्येशीं श्रीदासगणूंचा विवाह पुणें येथें झाला. बडोद्याची नोकरी बहुधा लग्नानंतर लगेच सुटली असावी. नोकरी लागून मुलगा आतां मार्गी लागला, या कल्पनेनें वडील मंडळींनीं दासगणूंचें लग्न केलें असावें. पण संस्थानी नोकरीचा साचेबंद ठोकळ मार्ग हा दासगणूंना भावणारा मार्ग नव्हताच मुळीं. मग त्यांत ते कसे स्थिरावणार! नगरास परत आल्यावर गांवांत भटकण्याचा कार्यक्रम यथापूर्व चालू झाला. उद्योग, धंदा, नोकरी, शिक्षण काहीं न करतां चकाट्या पिटीत उगाच भटकणें घरांतील वडील मंडळींना कसें रुचावें! कड घेणारी वत्सल आजीहि आतां पाठीशीं नव्हती. घरांतील वातावरण दासगणूंच्या विरुद्ध नेहमीं तापलेलेंच असे. घरांत प्रतिदिनीं खटके उडत. अशाच कांहीं कारणावरून एकदां थोडी अधिक कुरबूर झाली. दासगणूंची चुलती (श्रीजनार्दनपंतांचें कुटुंब) टोंचून म्हणाली, "डौल मिरवूं नकोस गणपती! शेवटीं आमच्याच नांवावर विकावें लागेल तुला! मी अमक्या अमक्याचा पुतण्या आहे, याच पतीवर तोंड वेंगाडून तुला पोट भरावें लागेल. खूप समजून राहा. नाहीं तर कोणत्या विद्येने लोक ओळखणार तुला?"

दासगणूंच्या मानी स्वभावास हे शब्द सहन झाले नाहींत. "विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते" या न्यायानें ते ताबडतोब उठून उभे राहिले व भावजयीकडून दुखावलेल्या कविभूषणाच्या त्वेषानें त्यांनीं उत्तर दिलें, काकी, पाणी पिण्यासही मी आतां येथें थांबत नाहीं! मात्र हें पक्के लक्षांत ठेवा कीं, कांहीं झालें तरी मी तुमचें नांव सांगणार नाहीं. लौकिक मिळविला वा उपाशी मेलों तरी माझ्या एकट्याच्या नांवा-

वर सर्व करीन, " असें तोडून बोलून ते जे घराबाहेर पडले ते कायमचेच. घरांतून उठले ते तडक श्रीविश्वनाथपंत निसळ यांचे घरीं गेले. अत्यंत जिव्हाळ्याचें व पोट उकलतां येईल असें विसाव्याचें तेवढेंच एक ठिकाण होतें.

श्रीविश्वनाथपंतांची परिस्थितीहि कांहीं विशेष चांगली, असें नाहीं. पण झालेली घटना एकेतांच त्यांनीं सांगितलें, " अरे, जाऊं दे रे ! काळजी मुळींच करूं नकोस. माझ्या पानांतल्या अर्ध्या भाकरींत तुझा चतकोर आहे, असें समज. " असा जिव्हाळ्याचा स्नेहसंबंध अलीकडच्या काळीं खरोखरीच फार विरळा झाला आहे. निसळांचें नांव निघतांच श्रीदासगणू महाराज अद्यापहि गहिंवरतात, तें उगीच नाहीं. घरच्या मंडळींनीं थोडीशी समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण उपयोग होणें शक्यच नव्हतें. ' जातो कुठें ? येईल कांहीं दिवसांनीं ' या कल्पनेनें घरचे लोक मग स्वस्थ राहिले. श्रीदासगणू हे त्यानंतर कधींच घरीं गेले नाहींत. नगरच्या रस्त्यावरून हिंडत असतांना एके दिवशीं पोलीस सुपरिंटेंडेंट एम्. केनडी या युरोपियन गृहस्थाशीं गांठ पडली. तो घोड्यावरून येत होता. श्रीजनार्दनपंतांबरोबर फिरतीवर असतांना त्या साहेबाची व दासगणूंची थोडी तोंडओळख झाली होती. त्यानें सहज विचारलें—

" कुठें निघालास असा ? "

" उद्योग मिळविण्याच्या खटपटींत आहे. "

" कां ? आजच अशी काय गरज पडली ? "

" घरीं परत जावयाचें नाहीं, अशा निश्चयानें बाहेर पडलों आहे. "

" मग पोलिसांत भरती होतोस कां ? पहा, तुझी नेमणूक करून घेतो. "

श्रीदासगणूमहाराज हे सशक्त आणि शरीरानें उंचांतच मोडणारे (५'—७") असल्यानें भव्यतेच्या दृष्टीने पोलिसांत भरती होण्यास योग्य आहेत. असें साहेबास वाटलें. शिवाय चांगल्या घरंदाज कुलांतील लोक शक्य तर पोलिसांत घ्यावे, असे त्या वेळचे सरकारी धोरण होते. साहेबाच्या म्हणण्यास दासगणूंनीं लगेच मान्यता दर्शविली. पण आपली नेमणूक नगरास करूं नये, असं सुचविलं. साहेब हंसत हंसत म्हणाला, ' ठीक आहे. उद्यां मला पोलीस कचेरींत येऊन भेट. ' त्याप्रमाणें दासगणू पोलीस कचेरींत हजर झाले आणि त्यांनीं साहेबाची गांठ घेतली. श्रीगोंदें येथें ९ रुपयांवर शिपाई नेमल्याचें आज्ञापत्र तयारच होतें. तें घेऊन घरीं मुळीच न कळवितां दासगणु श्रीगोंद्यास परस्पर नोकरीकरितां निघून गेले.

कांहीं दिवसांनीं ही वार्ता चुलत्यांचे कानांवर गेली. श्रीजनार्दनपंतांस यामुळें फार वाईट वाटलें आणि रागहि आला. ज्या सहस्रबुद्धे घराण्यांत आज तीन पिढ्या मामलेदारी चालत आली होती, त्या प्रतिष्ठित वंशांतील एका तरुणानें नऊ रुप-

ज्यांवर पोलिसची हलकी नोकरी करावी, हें त्यांना अत्यंत लाजिरवाणें वाटलें असल्यास नवल कोणतें ! ही अपमानास्पद नोकरी न करण्यासंबंधी जनार्दनपंतांनीं आपल्या पुतण्याचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. अधिक पगाराची व मानाची दुसरी-नोकरी मिळवून देण्याचें आश्वासनहि दिलें; पण दासगणूंच्या निग्रही मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं.

" क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः ।
पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् । "

एकदां धरलेली नोकरी सोडून देण्यास ते सिद्ध होईनात. श्रीजनार्दनपंतांचा निरुपाय झाला. अशा रीतीनें घराण्याचा संबंध जो एकदां सुटला तो नित्याचाच. श्रीदासगणूंनीं यानंतर नगर प्रांतांतच विशेषतः श्रीगोंदें, जामखेड, खर्डा, नगर नेवासें या गांवीं एकूण ११ वर्षें नोकरी केली.

सहस्रबुद्ध्यांच्या नाणावलेल्या कुळांत जन्माला येऊनहि आपल्या मुलाला पोलिसांत हलकी नोकरी कां करावी लागते. याचे ग्रहयोग तरी कोणते म्हणावे ? अशी सारखी विवंचना दासगणूंच्या मातुश्रीस—श्रीसावित्रीबाईस लागलेली असे. कोणी ज्योतिषी भेटला कीं त्याला दासगणूची कुंडली दाखवावी व भविष्य विचारावे. ते म्हणत, फार चांगले आहेत हे ग्रहयोग. या ग्रहयोगामुळे विद्वान, श्रीमंत वा अधिकारी लोकहि या व्यक्तीला पूजनीय वंद्य मानतील. हा पुरुष दहांचा पोशिंदा नी मोठा लौकिकवान् होईल. " कोणत्या मातेस हे ऐकून आनंद होणार नाहीं ! ज्योतिषांची संभावना त्या फार चांगली करीत. असें वरचेवर घडे. एक दिवस दासगणू त्रासले आणि आपल्या मातेस म्हणाले, " बाई तुला वेड लागणार आहे हं अशानें ! तुझ्याकडून पैसे उकळण्याकरितां हे लोक तोंडदेखले हवें तें सांगतात व तूं त्यांच्यावर विश्वास ठेवतेस. अग, इतकी चांगली कुंडली असल्यावर पोलिसांत बूट पुशीत कुणीं राहील काय ? थांब जाळूनच टाकतों ती पत्रिका ! " आणि खरोखरी त्यांनीं आपलें जन्मटिपण ' अग्नये स्वाहा ' केलें. कागद जळाला पण ग्रहयोग थोडेच पालटणार ! जें घडावयाचें होतें तें घडलेंच. इतकेंच नव्हे तर दासगणूंच्या वृद्ध मातुःश्रीसहि मुलाचा लौकिक लोकांनीं त्यांच्याविषयीं दाखविलेला अतिशय आदर आणि दिलेला मान हें सर्व पहावयास मिळालें.

नोकरीवर असतांनाच दासगणूंच्या काव्यगुणाचे पैलू तेजानें चमकूं लागले. घराण्याच्या प्रतिष्ठितपणाचें असें कोणतेंहि बंधन आतां उरलेलें नसल्यानें दासगणूंच्या कवितेस तमाशांच्या रंगेल क्षेत्रांत उघड उघड क्रीडा करण्यास कसलीच अडचण राहिली नाहीं. त्या काळीं तमाशा हेंच जवळ जवळ करमणुकीचें एकमेव साधन होतें.

आजच्यासारखे चित्रपट तेव्हां मुळींच नव्हते; पण नाटकेंहि मोठ्या वस्तीच्या नगरांतून क्वचित् होत. एरवी बहुतेक तमाशाच जनमनाचे रंजन करीत असे. त्यामुळें मामलेदार, फडणीस, वकील, शेठ, सावकार इत्यादि प्रतिष्ठित वर्गाचे लोकहि तमाशाचा यथाशक्य परामर्श घेत व आंतून उत्तेजनहि देत. अशा रसिकांच्या प्रोत्साहनानेंच दासगणूंच्या काव्याचा बहर रातराणीप्रमाणें या प्रांतांत मादकपणें दरवळूं लागला.

श्रीदासगणूंची या वेळची कविता तमाशाकरितां रचली गेली असली, तरी तिच्या विविधतेचे क्षेत्र विपुल व सर्वंकष आहे. त्यांची ही कविता कधीं इतिहासाचा मागावा घेत बाजीराव मस्तानीची भेट पोवाड्यात करून देई, तर कधीं गांवांतल्या मामलेदारापासून हवालदारापर्यंतच्या अधिकाऱ्यांची नांवनिशी मजेदार पद्धतीनें सादर करी. निर्मळ शृंगाराचें उत्तान वर्णन करण्यांत रसिकतेनें रममाण होई, तर कधीं निसर्गाच्या सौंदर्याचा आस्वाद घेत जोंधळा-बाजरीचें काव्यमय लग्न लावून सर्व पिकांची डौलदार वरात काढी. कधीं प्रल्हाद महाराजांसारख्या संतांचे गुणानुवाद गाई, तर कधीं गांवांतील लब्धप्रतिष्ठितांची कुलंगडी चव्हाट्यावर आणून झुळझुळीत पडद्यामागील अनाचाराचे दर्शन घडवी व श्रोत्यांना खदखदून हंसवावयास लावी. हा फटकळपणा असा वैशिष्ट्यपूर्ण असे कीं; ज्यांचा म्हणून त्यांनीं काव्यांत उपहास केला. तें काव्य चारचौघांच्या समोर त्या गृहस्थाच्या तोंडावर साथीदाराकरवीं म्हणावयाचें. त्यामुळें स्वतःला प्रतिष्ठित समजत डौल मिरविणारा माणूस श्रीदासगणूंच्या वाऱ्यासहि उभा राहात नसे. उलट वर्तनानें, सन्मानानें व योग्यतेनें तो दासगणूंनाच हलके लेखी. चांगला सज्जन माणूस घरच्यांशीं भांडून असा पांचटपणा करीत पोलिसांत कशाला राहील, असा पुरावा तो आपल्या निंदेस देई. दासगणूंच्या सभोंवतीचा तमासगीर, गोंधळी, पोलिसांतील हवालदार इत्यादि परिवार पाहून आणि डफ, तुणतुणें यावर गायलीं जाणारीं ग्राम्य गीतें ऐकून वर वर विचार करणारा त्यांच्याविषयीं साशंक होत असे.

पण ज्यांचा ज्यांचा त्यांच्याशीं अगदीं निकट परिचय घडला, जे त्यांच्या संगतींत एकत्रपणें खाल्ले, प्याले, बसले, उठले आणि म्हणूनच जे त्यांना अन्तर्बाह्य पाहूं शकले, अशा लोकांना मात्र श्रीदासगणूंच्या विषयीं नितांत प्रेमादर वाटत असे. सेवानिवृत्त होऊन पंढरपुरास राहिलेले श्री. दत्तोपंत खैर हे पोस्टमास्तर ( हे सध्यां दिवंगत आहेत, साईबाबांच्या समाधीपुढें शिरडीस नित्य म्हटली जाणारी आरती ज्यांनीं रचली ते श्री. माधवराव आडकर, हयातखॉं सरदारखॉं इत्यादि गृहस्थांना मी स्वतः भेटलों आहे. त्यांतील दत्तोपंत खैर आणि माधवराव आडकर या दोघांचें श्रीदासगणूंच्या बरोबर असलेलें नम्रतेचें व प्रेमादराचें वागणें मी वर्षानुवर्ष नवलानें पाहात आलों.

आहे श्री. दत्तोपंत खैर म्हणतात, "श्रीमहाराजांचें या वेळचें म्हणजे नोकरींत असतांनाचें वागणें वर वर कसेंहि दिसलें, तरी आंतून अगदीं निर्मळ होतें. पोलीस खात्यांतहि इतका निर्लोभपणा असू शकतो, याचें आम्हांस फार नवल वाटे."

महाराजांच्या चरित्रावरून

---

—सालबादाप्रमाणें श्रीसाई संस्थानचे मुंबई ऑफिसांत यंदाचा रामनवमीउत्सव साजरा झाला सकाळी १० ते १२·३० भजन व आरती व रात्रीं ९ ते ११ भजन व आरती झाली. सकाळचे भजन श्रीहनुमानप्रासादिक मंडळ दादर व रात्रीचे भजन श्रीकृष्ण भजन मंडळी अंधेरी यांचीं सुश्राव्य भजनें झाली.



## स्मरण

स्मरता साईरूप तें मनि।
आंसवें जमती या लोचनीं ॥ १ ॥
श्रद्धा, सबूरी या शब्दानी।
तरली ही अवनी ॥ २ ॥
जिथे कोरड्या पणत्या मधुनी।
तेलावाचून जळले पाणी ॥ ३ ॥
चुकलो कितिदातरी ही जीवनीं।
चालविसी तू हाती धरुनी ॥ ४ ॥
जीव गांजला सुखदुःखांनी।
वाहतसे मी तव चरणीं ॥ ५ ॥
करितो पूजा भावफुलांनीं।
सेवा घ्यावी गोड मानुनी ॥ ६ ॥

—बा. भा. मगदूम

# भागवत धर्माची प्रमूख लक्षणें

भागवतधर्म हा सनातन चालत आलेल्या हिंदुधर्मरूप प्रवाहांत अवगाहन करणारी जी तरुण गृहस्थांसारखी मंडळी तिचाच असून, प्रार्थनासमाज हिंदुधर्माचा फांटा नसल्यामुळें, या मंदिरांत भागवतधर्माचें निरूपण करणें हा प्रमाद होय, ह्या आक्षेपाला विशेष स्थान आहे असें नाहीं. तरी त्याचें निराकरण करितांना सनातन आर्यधर्म म्हणजे काय, त्याचीं विशेष लक्षणें कोणती त्यांच्यापैकीं भागवत धर्मांत किती आढळतात व प्रार्थनासमाजानें जो सांप्रदाय अंगिकारिला आहे. या गोष्टीचा आस्थेवाईकपणानें विचार केला असतां भ्रमाचें निरसन होईल व मनाला शंकेमुळें बाधा होणार नाहीं. यास्तव आर्यधर्माचीं विशेष लक्षणें, ज्यांच्या योगानें त्यास आर्यपण आले आहे, तीं कोणतीं याचा विचार ह्या ठिकाणीं करणें अन्यथा होणार नाहीं.

परंतु एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं जसें आपण एकाद्या थोर पुरुषाचा सहवास अगर ओळख करून घेण्याचा हेतु धरिला, आणि आपण त्यांच्या घराभोंवतीं घिरट्या घालीत राहिलों, अथवा पहारेकऱ्याचें अगर रक्षकांचें आर्जव करून जेथें तो गृहस्थ बसला असेल तेथें जाऊन फक्त त्याच्या चेहऱ्याकडे पोषाखाकडे व राहण्याच्या वहिवाटीकडे पाहिलें, तर त्याचा कांहीं विचित्र प्रकार दिसतो. तो आर्यलोकांप्रमाणें राहात नाहीं, आपल्यामध्यें अंतर पडलेले आहे असें, त्याच्याबरोबर बसून बोलणें चालणें वगैरे जे खऱ्या स्वरूपाच्या ओळखीचे उपाय त्यांचा लाभ न झाल्यामुळें आपणांस वाटतें. तसाच प्रकार ह्या समाजाच्या भोंवतीं घिरट्या घालणारास, अथवा सभासदांचे तऱ्हेतऱ्हेचे पोशाख, खुर्चीवर बसणें, फक्त रविवार खिस्ती लोकांप्रमाणें उपासनेस जमणें वगैरे वरवरचे प्रकार पाहाणारास होऊन या संस्थेच्या खऱ्या स्वरूपाची त्यास ओळख होत नाहीं. तर तुम्ही हिच्या संबंधानें ओळख म्हणून जो विशेष भाग आहे त्याचा लाभ करून घ्या. जसें उदाहणार्थ घेतलेल्या थोर गृहस्थाची चांगली ओळख पटल्यानंतर त्याच्या पोशाखावरून अवहेलना करणें सुटन तो खरा आर्य, असें वाटतें आणि त्याची न्यायबुद्धि, सभ्यता, विद्वत्ता वगैरे सद्गुण आपणांस समजून येतात; तसेंच या आमच्या सांप्रदायाच्या संबंधानें उपकरण्याकडेस पाहाणारांस सहवासाशिवाय खरी ओळख होणार नाहीं. म्हणून सांगणें हेंच कीं, सहवास करा, म्हणजे तुम्हांस ह्या संस्थेचें खरें स्वरूप कळेल. आणि प्रार्थनासमाज आर्यधर्माच्या अंतर्गत होतो, किंवा अन्य धर्मांशीं

याचें सहचर्य आहे तें समजेल. पोषाक, आचार, बसण्याची तऱ्हा इत्यादि बाह्य स्वरूपांवरून अंतर्गुणांविषयीं तर्क बांधणें बरोबर होणार नाहीं.

परमेश्वराचा व भक्ताचा साक्षात् संबंध, हें आर्यधर्माचें पहिलें व अत्यंत महत्वाचें लक्षण होय. भक्त किती हीन, दीन, पतित, अज्ञान, कंगाल असो, त्याचें मन कळवळलेलें असलें व तो खरोखर दुःखी असला, तर त्याचें देव प्रत्यक्ष संगोपन करितो, व तें आपल्या हाताने स्वतः करितो. त्याला मध्यभागी गरज लागत नाहीं, भट पुजारी कांहीं नको. आर्यधर्मामध्यें कितीही शाखा व सांप्रदाय असले ' त्यावर कितीही पडदे अगर मातीचा लेप बसलेला असला, तरी आर्यधर्मांत भक्त अधिकारी, ज्ञानवान्, उच्च जातीचा पाहिजे असें नाहीं. जितका तो अनाथ, त्रस्त असेल, तितकें त्याला देव प्रत्यक्ष दर्शन देऊन त्याचा उद्धार करितो. कधीं कधीं भक्त मागतो एक, आणि देव देतो दुसरेंच. परंतु परिणामी भक्ताचें कल्याणच होतें. आर्यधर्मांत ह्यासंबंधानें गोम असते; दैवताच्या आणि उपासकाच्या मध्यें पडदे असतात. तसे यांत नाहींत, व देवाचा आणि भक्ताचा प्रत्यक्ष संबंध असतो. भक्त विठ्ठल झाला, कासावीस झाला म्हणजे पुरे; मध्यस्थ पुरुषाची कृपा नलगे.

आर्यधर्माचें अंगभूत, सर्वव्यापी, व शाखांला लागू दुसरें लक्षण हें कीं, तो ऐतिहासिक धर्म नव्हे. अमुक एका कालीं, अथवा देशीं, अमुक एका व्यक्तीला परमेश्वरानें रूप धारण करून खरा धर्म सांगितला; अन्यत्र सर्व अंधार ठेविला, हा विचार यांत नाहीं. याच्यामध्यें संप्रदाय अनेक आहेत, तरी त्यांतून अमक्या एका पुरुषानें उपदेशिला तोच आर्यधर्म, असें आढळावयाचें नाहीं. अमुक दुसरा, एक अधिष्ठाता, एक अधिकरण असें नाहीं. सर्वांची योग्यता सारखी. हा ऐतिहासिक नाहीं. यावरूनच याच्या तिसऱ्या लक्षणाची प्राप्ति होते. कोणताही धर्म ऐतिहासिक असला इतिहाससिद्ध ठरलें तेंच सत्य, त्यांत अंतर पडावयाचें नाहीं. असें झालें म्हणजे अर्थात बाढीला अटकाव झाला.

आर्यधर्मांप्रमाणें तिसरें लक्षण हें कीं, हा इतर धर्मांप्रमाणें स्थायिक नसून याला वाढ आहे. एकाद्या झाडास कधीं वाढ, कधीं उतरती कळा, कधीं जरा अशा अवस्था प्राप्त झाल्या तरी खच्ची करून खत मसाला घातला, म्हणजे वाढीची शक्यता असते; तशी या धर्माची खुबी आहे. याचीं पूर्वरूपें पुष्कळ झालीं व उत्तररूपें व्हावयाचीं आहेत. याला अनंतकालपर्यंत वाढ आहे; तिला अवधि नाहीं. यांत नवे संप्रदाय, नवीन रूपांतरें, नवीन मिश्रण होत जाणार आहे. ऐतिहासिक रूप नाहीं म्हटलें म्हणजे वेदादि ग्रंथ तुमच्यांत नाहींत व असल्यास ते तुम्हांस पूज्य आहेत काय, असा प्रश्न निघतो. होय. तीं धर्मपुस्तकें खरीं व तीं मान्यही आहेत;

परंतु प्रथम वेदांचें बंधन होतें. तरी तितक्यानें समाधान होईना, तेव्हां उपनिषद्रूप आवरण झालें. पुढें पुराणें झालीं. परंतु त्यांतील बाष्कळपणा न रुचल्यामुळें साधुपुरुषांनीं भक्तिमार्ग, वारकरीपंथ वगैरे स्थापित केले. अशीं अनेक रूपांतरें होत होत स्तिमितपणा, तटस्थपणा, जरा हीं अनुभवीत असतांही एकाकी खची केलेला खुंट वाढतो त्याप्रमाणें आपण येथवर आलों आहों; त्याची वाढ चालूच आहे.

आर्यधर्माचें चौथें लक्षण हें कीं, या वाढीला एक विशेष दिशा आहे व ती प्रेमाची आहे. जसें झाड सूर्याच्या उजेडाच्या बाजूला वाढ घेतें, त्याचप्रमाणें ह्या धर्माची वाढ तेजोरूपी प्रेमाच्या बाजूला आहे. कधीं कधीं यावर पांघरुणें पडतात, सत्याचा अपलापही होतो, परंतु वाढ खुंटत नाहीं. दोन हजार वर्षांमागें अग्निहोत्रादि यज्ञासाठीं पशुवध होत असत, प्रेमभावाचें आधिक्य होऊन ती चाल लोकांनीं सोडून दिली. प्रेमबंधन वाढावें, कोणाला दुःख होऊ नये, हीच सार्वत्रिक प्रवृत्ति. जातिबंधन वगैरे निर्बंध व अडचणींचे प्रकार असतां प्रेमाची वाढ आहे, अधिकार वाढत आहे, व वाढीची व्याप होत आहे. कर्मठपणा व जातिनिर्बंध असतां ही स्थिति व परस्परांविषयीं वैमनस्य नाहींसें व्हावें हीच इच्छा; तर मग ती शिथिल होतील तेव्हां काय प्रकार होईल तो काय सांगावा!

छाप मारून दुसरा छाप धर्माच्या बाबतींत उठवू म्हटल्यास जमत नाहीं. परमेश्वराच्या पायांपासून वाहात आलेल्या ह्या धर्मगंगेचा ओघ प्रेमाचा असून त्यानें प्रफुल्लित झालेल्या वृक्षावरील **भागवतधर्म** हें अत्यंत सुवासिक फूल व मधुकर फळ आहे, असें आपणांस दिसून येईल; व बारकाईनें विचार करून पहाणारास प्रार्थनासमाजाचें व भागवधर्माचें लक्षणांच्या संबंधानें साहचर्य अत्यंत आहे, हें त्यांतील सभासदांचे पोषाक, बसणें उठणें कसेंही असलें तरी, सहज समजेल. आपल्या देशांतील महापुरुषांनीं आपल्या प्रसादरूप वाणीनें व प्रसादरूप वर्तनानें ज्यांत कोणतेही पर्वत आड घातलेले नाहींत, असा भक्तीचा मार्ग खुला करून दिला आहे. मात्र सत्संग करून सद्ग्रंथ वाचून गैरसमजुतीचे जे भाग असतात त्यांविषयीं आपल्या भ्रमांचें निरसन करून घेतलें पाहिजे. कोणी म्हणेल तुमच्या ह्या धर्माच्या आज्ञा किती व कोणत्या आहेत, तें सांगा. त्यास आमचे उत्तर हेंच कीं आमच्या धर्माच्या आज्ञा आठ आहेत, किंवा दहा आहेत असें नाहीं. सर्व मानवबंधूंशीं प्रेमानें वागावें, हीच त्यांतील मुख्य आज्ञा. वर सांगितलेल्या लक्षणांवरून भागवत धर्माचें व प्रार्थनासमाजाचें साहचार्य आहे व त्या धर्माचा या व्यासपाठीवरून उपदेश करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं, अशी खात्री होईल.

—न्या. रानडे यांचे एक प्रवचन

———

# गीतेंतील संन्यासयोग

अठरावे अध्यायाचे आरंभीं अर्जुन कृष्णास म्हणतो, "कृष्णा, संन्यास आणि त्याग या दोहोंचें पृथक स्वरूप मला सांग." कृष्ण म्हणतो,—" अर्जुना, कामनिक कर्मांचा त्याग, याला संन्यास म्हणतात; आणि सर्व कर्मांचा त्याग, याला संन्यास म्हणतात; आणि सर्व कर्मांच्या फलाची वासना सोडणें याला त्याग म्हणतात कीं, सदोष कर्में मात्र टाकावीं; दुसरे म्हणतात कीं, यज्ञ, दान, तप, हीं कर्में टाकूं नयेत. त्यांविषयीं माझें निश्चित मत मी तुला सांगतों. यज्ञ, दान, तप, ही कर्में टाकूं नयेत; अवश्य करावीं. कारण हीं कर्में ज्ञानीजनांसही पवित्र करणारीं होतात, हीं कर्में अनासक्त होऊन अवश्य करावीं. कर्म-त्यागाचे तीन प्रकार आहेत. जें कर्म अवश्य कर्तव्य जाणून, फलाची आशा सोडून केलें त्याला सात्विक त्याग म्हणतात. शरीरास क्लेश होतील म्हणून कर्तव्यकर्म टाकणें, हा राजस त्याग; या त्यागापासून फल नाहीं. अज्ञानानें कर्तव्यकर्मांचा त्याग करणें, याला तामास त्याग म्हणतात. जो अनासक्त होत्साता कर्तव्यकर्म आचरितो, तोच खरा त्यागी. कोणचेंही कर्म होण्यांस पांच कारणें लागतात; (१) स्थान, (२) कर्ता, (३) नाना साधनें, (४) विविध उद्योग आणि (५) दैव. हीं पांच कारणें असतां जो आपल्यासच केवळ कर्ता मानितो, तो मूढ होय. ज्ञान तीन प्रकारचें आहे—सात्विक, राजस, तामस. सर्व भूतांचा व्यापक एक परमात्मा आहे,—असें जें ज्ञान तें सात्विक; नानाभूतें आपापल्या शक्तीनें चालताहेत, हें सर्व जग आहे तसें आहे, याला कोणी कर्ता नाहीं, अशी जी खोटी, क्षुद्र कल्पना, तिला तामस ज्ञान म्हणतात. याप्रमाणेंच कर्मही तीन प्रकारचें आहे. जें कामक्रोधरहित होऊन फलाशा सोडून, अवश्य कर्तव्य म्हणून कर्म करावें, तें सात्विक कर्म. जें कांहीं हेतु धरून, किंवा अहंमतीनें बहुत आयास करून कर्म करावयाचें, तें राजस कर्म. आपण जें कर्म करितों त्याचा परिणाम चांगला किंवा वाईट होईल, त्यास द्रव्य किती खर्च होईल, त्यापासून दुसऱ्यास पीडा होईल कीं काय, तें करण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं आहे कीं नाहीं, याचा विचार न करितां जें अज्ञानानें कर्म आरंभिलें जातें, तें तामसकर्म. तसेंच, कर्ताही तीन प्रकारचा असतो. अनासक्त, गर्वहीन, धैर्ययुक्त, उत्साहयुक्त, लाभहानीविषयीं उदासीन, असा जो कर्ता तो सात्विक. जो लोभी, कर्मफलाची इच्छा करणारा, परपीडा करणारा, अद्रकर्मांचा हर्षविषाद मानणारा, असा जो कर्ता तो रजोगुणी कर्ता, जो आसक्तबुद्धि, अविवेकी,

उद्धत, शठ, दुसऱ्याचा अवमान करणारा, आळशी, वृथा काळजी बाळगणारा, दिर्घसूत्री, असा जो कर्ता तो तमोगुणी. तद्वत, बुद्धिही तीन प्रकारची आहे. ज्या बुद्धीनें उत्पत्ति व नाश, कर्तव्याकर्तव्य, भयाभय, बंधमोक्ष, यांचें यथार्थ ज्ञान होतें, ती सात्विक बुद्धि; जिणें धर्म, अधर्म, कर्तव्याकर्तव्य, यांचें यथार्थ ज्ञान होत नाहीं, ती रजोगुणी बुद्धि; आणि ज्या बुद्धीस अज्ञानाचे योगानें अधर्म धर्म असा वाटतो आणि सर्व गोष्टी विपरीत भासतात, ती बुद्धि तमोगुणी तद्वत्‌च धृति ( अवधान ) ही तीन प्रकारची आहे. जिच्या योगानें मन, प्राण, इंद्रियें, यांची कर्मे व्यवस्थित रीतीनें आणि अनासक्ततेनें होतात, ती सात्विक धृति; जिच्या योगानें धर्म, काम, द्रव्यसंपादन, हीं प्रसंगोपात्त फलाची इच्छा होऊन घडतात, ती रजोगुणी धृति; जिच्या योगानें निद्रा, भय, शोक, विषाद हीं नाहींत, ती नमोगुणी धृति. सुखही तीन प्रकारचें आहे तें सांगतों. ऐक. जें अभ्यासानें प्रिय वाटूं लागतें, त्याच्यायोगानें पुनः दुःख होत नाहीं, जें आरंभीं विषासारखें कडू, पण परिणामीं अमृतासारखें गोड, तें सात्विक सुख. तें आत्मज्ञानानें चित्त प्रसन्न झालें असतां प्राप्त होतें. विषयांपासून होणारें जें प्रथम अमृतासारखें गोड, पण परिणामीं, विषासारखें कडू, तें राजस सुख. जें आरंभीं, तसेंच परिणामीं, आत्म्यास मोह पाडणारें, जें निद्रा, आळस, प्रमाद यांपासून होणारें, तें तामस सुख, याप्रमाणें या तिन्ही आत्मसंयमन गुणांचें स्वरूप तुला सांगितलें. यावांचून एकही प्राणी नाहीं. आतां ब्राम्हणादि वर्णांचे स्वभावसिद्ध धर्म सांगतों;—

“मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह, तप, निर्मळपणा, चित्तशुद्धि, क्षमा, सरळ बुद्धि, ज्ञान, अनुभव, परलोकाविषयीं आस्तिक्यबुद्धि, हे ब्राम्हणाचे स्वाभाविक धर्म होत. शौर्य, बळ, धैर्य, चातुर्य, वीर्य, दातृत्व, ऐश्वर्य, हे क्षत्रियांचे स्वाभाविक धर्म होत. कृषिकर्म, गोरक्षण, व्यापार, धंदा, हे वैश्यांचे स्वाभाविक धर्म. पूर्वोक्त तीन वर्णांची सेवा करणें हा शूद्रांचा स्वाभाविक धर्म. ज्यांचें कर्म त्यास इतरांपेक्षां विशेष श्रेयस्कर. तें त्यानें केलें असतां त्यास कांहीं दोष लागत नाहीं. तें आचरून जो सर्व जगत्कर्ता आणि जगन्नियंता प्रभू याची उपासना करितो, तो मोक्षपद पावतो. याप्रमाणें अनासक्त होऊन, मनुष्य आपलें कर्तव्यकर्म करून, ब्रह्मनिष्ठ कसा होतो तेंही मी तुला सांगतों. शुद्धबुद्धियुक्त होत्साता करून विषयांकांक्षा सोडून, कामक्रोधविरहित होऊन, एकांतवास करून मिताहार करून शरीर, वाणी, मन, यांचा निग्रह करून, वैराग्ययुक्त व ध्यानपरायण होत्साता काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर टाकून, शांत होत्साता प्राणी ब्रम्हपदास योग्य

होतो. ब्रम्हपदाची प्राप्ति झाली म्हणजे प्रसन्नचित्त होत्साता तो कशाचीही इच्छा किंवा शोक करीत नाहीं; सर्वांभुती समदृष्टी ठेवून माझी दृढ भक्ति करितो. आणि माझ्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान संपादून, माझे ठायीं लीन होऊन होत्साता, परमानंद अनुभवतो. यास्तव तूं सर्व कर्मे निष्काम बुद्धीनें आचरून मला निवेदन कर; आणि माझे ठायीं भाव ठेवून सतत माझी भक्ति कर; तेणेंकरून मी प्रसन्न होत्साता, तुला सर्व संकटांपासून तारीन. जर तूं अंहकारानें माझें न ऐकशील तर नाश पावशील. तूं अंहकारानें मी युद्ध करणार नाहीं. असें जें म्हणतोस, हा तुझा निश्चय व्यर्थ आहे; तुझा स्वभाव तुला तिकडे वळवील. जें मोहामुळें तूं आतां करूं इच्छीत नाहींस, तें स्वभाववश होऊन तूं करशील. यास्तव सर्व भूतांचा चालक, सर्व अंतांचा अंतरात्मा, जो जगदीश्वर, त्यासच अनन्यभावेंकरून शरण जा. त्याच्या कृपनें अत्यंत शांति आणि शाश्वतपद हीं तुला प्राप्त होतील. हें तुला अत्यंत गूढ ज्ञान मीं सांगितलें. या सर्वांचा विचार करून जसें तुझ्या इच्छेस येईल तसें तूं कर. परंतु तूं माझा अत्यंत मित्र आहेस, म्हणून तुझ्या हिताकरितां पुनः हें परमरहस्य मी तुला सांगतों.—माझें ठाईं मन ठेव; माझी भक्ति कर; कर्तव्यकर्म करूत मला निवेदन कर आणि मला शरण ये. म्हणजे तूं माझेपाशी निश्चय करून येशील. हें मी तुला खरोखर प्रतिज्ञा करून सांगतो; कारण तूं माझा प्रिय मित्र आहेस. सर्व धर्म एकीकडे ठेवून, केवळ मलाच शरण ये; मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन; भिऊ नको. हें ज्ञान तपोहीनास, भक्तिहीनास, अनादरकर्त्यांस, किंवा नास्तिकास सांगू नको. जो हें परम गुह्य ज्ञान माझ्या भक्तांस सांगेल, तो माझी परम भक्ति करून निःसंशय मजप्रत येईल. त्याच-प्रमाणें मला संतोषविणारा या पृथ्वीवर दुसरा कोणीही नाहीं तसेंच जो या आमच्या पवित्र संवादाचें अध्ययन करील, तो ज्ञानयज्ञानें माझी आराधना करील, तसेंच जो श्रद्धेनें आणि अस्तिक्यबुद्धीनें हा संवाद ऐकेल. तोही पुण्यलोकाप्रत जाईल. अर्जुना, हें सर्व तूं एकाग्र चित्तानें ऐकिलेंस काय ? अज्ञानामुळें झालेला मोह नष्ट झाला काय ? अर्जुन उत्तर करितो— " कृष्णा माझा मोह दूर झाला; तुझ्या कृपेनें माझें मन पुनः वृत्तीवर आलें. माझा संदेश गेला. आता मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें करितों. "

याप्रमाणें कृष्णार्जुनांचें भाषण धृतराष्ट्रराजास सांगून संजय म्हणतो;—" या-प्रमाणें कृष्णार्जुनांचा हा परम अम्दुत व आश्चर्यकारक संवाद मीं ऐकिला. व्यासाच्या कृपेनें साक्षात् योगीश्वर कृष्ण याचें मुखांतून हें परम गुह्य ज्ञान, हा श्रेष्ठ योग, मीं ऐकिला. हे राजा, हा कृष्णार्जुनांचा अम्दुत व पवित्र संवाद आठवून आठवून, पुनः पुनः माझ्या चित्तास आनंद होतो.

तसेंच श्रीहरीचें ते अत्यंत अम्दुत रूप आठवून आठवून मला परमविस्मय होतो; व पुनः पुनः शरीर रोमांचयुक्त होतें. निश्चयेंकरून जिकडे योगीश्वर कृष्ण, जिकडे पार्थ वीर, तिकडे लक्ष्मी, तिकडे जय, तिकडे भाग्य, तिकडे न्यायें, असें माझ्या बुद्धीस वाटतें."

याप्रमाणें या अठराव्या अध्यायांत संन्यासरूप जो मोक्षमार्ग त्याचा मुख्यत्वें उपदेश आहे, यामुळें यास **संन्यासयोग** असें नांव दिलें आहे.

---



# पावन मज केलें !

पावन मला केलें देवून नरजन्म।
साईनाथा केले उपकार ॥
निसर्गाचे भांडार केलें मला खुलें।
नयन हे दिले देखण्याला ॥
दिली मला बुद्धी करावया भक्ति।
भक्ति मनीं माझ्या वाढविली ॥
भक्तिमार्गांतील जाणाया रहस्य।
बुद्धी मज दिली शिरडीनाथा ॥
सखा म्हणें द्यावी तूंच काव्यशक्ति।
वर्णाया महती साई तुझी ॥

—सखाराम र. बोन्द्रे [मोहन] भेडशी




## [मार्च १९६५]

या महिन्यांत बाहेर गावचे भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणें होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें.

### किर्तन

संस्थान गवई यांची नेहमीप्रमाणें एकादशीस कीर्तनें झाली. श्री. तुकारामबीज या दिवशी कीर्तन झालें.

### गायन

श्री. जगन्नाथ पंढरीनाथ मोहिले दादर मुंबई फ्ल्यूट बासरी ( वादन ) झालें. कु. इंदूमती नामदेव गोरे, गिरगांव मुंबई श्री. यशवंत सखाराम कुवळेकर मुंबई. श्री. सूर्यकांत पंढरीनाथ मोहिले दादर मुंबई, श्री. सौ. शैला सूर्यकांत मोहिले दादर मुंबई. श्री. मोहन मारुति चव्हाण अ. नगर. श्री. गणपतराव देवासकर मुंबई,

### तबलावादन

श्री. महादेव नारायण इंदूरकर व कुमार नरेश महादेव इंदूरकर दादर मुंबई.

### लोकनाट्य हजेरी

श्री. दामू काशिनाथ पगारे धुळेकर

### चौघडावादन

श्री. सोनबा मारुती आढाव मु. पुणें. कसबापेठ५४७

### सांस्कृतिक कार्यक्रम

कला संगम पथक प्रो. अप्पासाहेब इनामदार, पुणें.

रंगपंचमीनिमित्त श्रीचे रथाची गांवातून मिरवणूक झाली.

### शिर्डी येथील हवापाणी

हल्ली उन्हाळा भासू लागला आहे. रोगराई कांहीं नाही !

# रामनामासारखी दुसरी किमया नाहीं

लेखक : महात्मा गांधी

**कांहीं ठराविक व निवडक लोकांनींच रामनाम घ्यावें व इतरांनीं घेऊं नये असें थोडेंच आहे ? तो ठेवा सर्वांसाठीं आहे. तो कोणीहि वाटेल तेवढ्या प्रमाणांत लुटावा. तो कधींहि न संपणारा व जितका उचलाल तितकें तुमचें कल्याण करणारा आहे.**

त्या ठेव्यांतील जितकी म्हणून तुम्हीं उचल कराल तितकी त्या ठेव्यांत व तुमच्यांत वाढ होत जाईल. तो ठेवा अथांग आहे, तसाच अवाढव्य आहे. त्याला व त्यामुळें लाभणाऱ्या सुखसमाधानाला मर्यादा नाहीं. तुम्हीं शारीरिक, मानसीक किंवा दुसऱ्या कोणत्याही दुःखानें पिडलेले असा, त्याच्यावर रामनामासारखा दुसरा रामबाण उपाय नाहीं हें निश्चित समजा.

राम हे भगवंतांच्या असंख्य नावापैकीं एक नांव आहे. या जगांत जितकीं माणसें वावरत आहेत तितकीं भगवंताची नावें आहेत. तुम्हीं रामा ऐवजी कृष्णाचें किंवा दुसरें कोणतेंही जें तुमच्या आवडीचें नांव असेल तें घेऊं शकतां त्यावर संपूर्ण श्रद्धा मात्र असली पाहिजे. नावांत काय आहे ? जें तुमच्या आवडीचें व ज्यावर तुमची श्रद्धा आहे तें नांव घ्या.

माझ्या आवडीचें रामनाम आहे व त्याला कारणही तसेंच आहे. बाळपणीं माझें संगोपन करणारी माझी एक आया होती. तिनें ही रामनामाची जोड मला दिली. लहानपणीं काळोखांत मी फार घाबरत असें. मला भुताखेतांचीं भीती वाटत असते व त्यांचीं स्वप्नेंही पडत असत. माझी ही भीती मीं एकदां त्या आयाला सांगितली तेव्हां ती म्हणाली " अरे ' वेडा रे वेडा त्यांत घाबरायचें काय ? नेहमीं रामनाम घेत जा. म्हणजे भुतेखेतें पळून जातील. त्या नावाच्या ती वाऱ्यालाही उभी रहात नाहींत, समजलास ?" त्या वेळेपासून मी रामनाम घ्यायला लागलो व त्यावर माझी श्रद्धाही बसली. बालपणी जी एकदां श्रद्धा बसली ती वयोमानाबरोबर मुळींच कमी न होतां उलट उत्तोरत्तर वृद्धिंगत होत गेली. रामनाम हें मला कोणत्याही संकटाचें निवारण करणारें सुदर्शन चक्र वाटूं लागलें. मी त्याचा ढालीप्रमाणें उपयोग करूं लागलों. रामनामानें मला निर्भय बनविलें. मला कळिकाळाचेंही भय वाटेनासें झालें.

बालपणांत मला रामनामाचा कवचाप्रमाणें उपयोग झाला मग मोठेपणीं काय झालें हें का सांगायला पाहिजे ? मोठेपणीं आपण समजूतदार बनतो. श्रद्धाशील बनतो. श्रद्धेचें महत्त्व मनाला पटतें त्यामुळें रामनामाचा सहाजिकच जास्त उपयोग होत असतो.

होय; त्याला एक मोठी किमया आहे.ती कोणती ? रामनाम अंतःकरणापासून घेतां आलें पाहिजे. त्यावर संपूर्ण श्रद्धा असली पाहिजे. तुमच्या मनांत कधीं वाईट, दुष्ट विचार येतात का ? तुम्हांला स्त्री विषयक किंवा संपत्ती विषयक विचार सतावून सोड-तात का ? खरोखर ते फार हानीकारक असतात. त्यापासून तुमची सुटका करणारा रामनामासारखा दुसरा महामंत्र नाहीं ! ती मोठी किमया आहे. तें मंतरलेलें व भारलेलें नांव आहे. साधेंसुधें नाहीं. तुमचें दुःख नाहींसें करण्याचें त्यांत सामर्थ्य आहे.

समजा कीं, खोट्यानाट्या मार्गांचा अवलंब करून किंवा अप्रामाणिकपणें आपण खूप खूप संपदा जवळ करावी व बायकोचें आणि मुलांबाळांचें कल्याण करावें असा दुष्ट विचार कधीं काळीं तुमच्या मनांत आला व तुमची रामनामावर श्रद्धा असली तर ते विचार मनांत आले तरी त्यांचे आचरण करावें असें तुम्हांला कदापी वाटणार नाहीं. तुम्हीं म्हणाल, काय ? बायकोपोरांसाठीं किंवा स्वतःच्या चैनीसाठीं अप्रामाणिकपणें संपत्ति मिळवायची ती कधीं कोणाजवळ टिकून राहिली आहे ? ती त्यांच्या हातून हां हां म्हणतां कोणत्या मार्गानें जाईल हें समजणारसुद्धां नाहीं ! काय करायची आहे ती संपदा ! त्यापेक्षां त्यांना दानत संभाळून नीति धर्मानें व माणुस-कीनें वागण्याचें मी जर शिक्षण दिलें व त्यांना स्वतःच्या पायांवर उभे राहून प्रामाणिकपणें पोटापुरतें मिळविण्याचें शिक्षण दिले तर तेंच त्यांच्या शाश्वत कल्या-णाला कारणीभूत होणार नाहीं का ? तेंच तर माझें पवित्र कर्तव्य आहे. त्याचें पालन मी करावें.

रामनाम हें सर्व बंधनापासून तुमची सुटका करणारें व तुमच्या मनांत वावर-णारा खोटा मोह, माया व लोभ यापासून तुमची सुटका करणारे आहे. या जगांत कोण कोणाचे नाहीं. आम्हीं खोट्या मोहजाळांत गुरफटलेले आहोंत.तें जाळें तोडण्याचें सामर्थ्य रामनामांत आहे.

कशाला वणवण भटकायचें व जिवाला त्रास करून घ्यायचा ? कोण कोणाचा नाहीं. आपण आपलें प्रत्येकासंबंधी असलेलें कर्तव्य निर्लोभपणें पार पाडायचें आणि मोकळा व्हायचें. कशालाही चिकटून रहायचें नाहीं. चिकटपणें म्हणजे स्वतःला दुःखांत गाडून घेणे सोडून द्या तें व श्रद्धापूर्वक रामनामाला चिकटा. तेंच तुमच्या कल्याणाला कारणीभूत होईल.

# दर्शन

मृगापरी धांवे मन ।
घ्याया समाधी दर्शन ॥ १ ॥

होती पतित-पावन ।
सर्व सुजन दुर्जन ॥ २ ॥

सोडूनिया अभिमान ।
गाती साई गुण-गान ॥ ३ ॥

विसरून जाती भान ।
उदी धुनींची लेऊन ॥ ४ ॥

मीहि शिरडी पाहून ।
गेलों अपार मोहून ]

जगीं जन्माला येऊन ।
घ्यावें समाधी दर्शन ॥ ६ ॥

—बा. भा. मगदूम



## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– | | by Pradhan | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणिस–दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन–मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.